# पुण्यभूमी

संपादक:बाळासाहेब मस्के

## मोहन जगतापांना पडण्यासाठी राष्ट्रवादीचा गट सक्रीय | बाप्पांनी नातेवाईक दिला खरे पण उपयोग नाही

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव मतदार संघात,अटीतटीची चुरस होणार आहे. कारण तेवढ्याच ताकदीचे उमेदवार निवडणूक रिंगणात उभा आहेत. त्यामुळे कोणाला विजयाचा गुलाल लागेल याचा काही नेम नाही.परंतू असे असले तरी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आयते उमेदवार मोहन जगताप, यांचा पराभव मात्र शंभर टक्के होणार आहे. त्यासाठी त्यांच्याच पक्षातले लोक अंधारातून प्रचार करु लागले आहेत. त्यामध्ये आता मोहन जगताप यांचा 'तो' व्हिडीओ पून्हा बाहेर आल्याने त्यात आणखीन भर पडली आहे. खरंतर मोहन जगताप माजलगाव मतदार संघाला मान्य नसलेले उमेदवार आहेत. त्यांची बोली-भाषा सुसंस्कृत नाही. तशी अनेक उदाहरणे देता येतील.आशा चर्चा लोकांमध्ये उमटत आहेत.

### ज्या लोकांनी तुमचे कधीच प्रश्न मांडले नाहीत!

माजलगाव मतदार संघातील मतदारांनो तुमच्या समस्यांचे, विकासाचे, ऊसाला योग्य हमीभाव देण्याचे,बेरोजगारीचे, अन्याय-आत्याचाराचे प्रश्न घेवून मोहन जगताप कधीच लढले नाहीत.तुमच्या सुखदु:खात सहभागी झाले नाहीत. त्यामुळे विचार करुन निर्णय घ्या, योग्य उमेदवार ओळखा आणि बदल घडवून आणा असा प्रचार जागरुक तरुण करत असल्याचा चर्चा आहेत.

माजलगाव मतदार संघात, मोहन जगताप, प्रकाश सोळंके, शेख मंजूर चाँद, रमेश आडसकर, माधव निर्मळ, बंडखोर बाबरी मुंडे यांच्यामध्ये चुरशीची फाईट होणार आहे. या निवडणुक रिंगणात प्रत्येक उमेदवार तेवढ्याच ताकदीचा आहे.मात्र लोकांचा कल कोणत्या बाजूने राहील यावर विजयाचे गणित अवलंबून आहे. त्या विजयाच्या गणितात मोहन जगताप पिछाडीवर असणार आहेत. माजलगाव मतदार संघात कधीही सक्रीय नसलेले मोहन जगताप यांना, बाप्पाच्या कृपेने उमेदवारी मिळाली, त्याचा फटका निश्चित मानला जात आहे. ठराविक लोक वगळता त्यांच्या सोबतीला फार लोक आहेत असे दिसत नाही.त्यामुळे लोकसभेला आलेली लाट पूर्णपणे ओसरली असल्याने मोहन जगताप उघडे पडले आहेत. राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून जरी मोहन जगताप निवडणूक लढवित असले त्याचा त्यांना फायदा होणार नाही.कारण मराठा समाज म्हणावा तेवढा उभा राहिलेला नाही.उरला प्रश्न दलित-मुस्लिम समाज मतांचा तोही त्याच भूमिकेत आहे.

माजलगाव मतदार संघाचा एक असा इतिहास राहिलेला आहे, या मतदार संघाने कोणालाच पहिल्यांदा निवडून दिलेले नाही. आगोदर पराभवाला सामोरे जावे लागते, त्यानंतर लोक निवडून देत आलेले आहेत. त्यामुळे मोहन जगताप यांचा १०० टक्के पराभव होणार असून त्याला अनेक कारणे आहेत. मोहन जगताप यांचा 'तो' व्हिडीओ पून्हा व्हायरल झाला असल्याने मोहन जगताप ट्रोल होण्याचे संकेत आहेत. नेमका कोणता व्हिडीओ आणि त्यामध्ये काय वक्तव्य आहे. याचा नेटकऱ्यांना प्रश्न पडला आहे. त्यामुळे त्यांच्या पराभवात भर पडली आहे. आशा चर्चा माजलगाव मतदार संघातील लोक करु लागले आहेत.

## मोहन जगतापांचा तो व्हिडीओ पुन्हा बाहेर?

आयत्या पिठावर रेघोट्या मारुन चालत नाही



बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

मोहन जगताप १०० टक्के पडण्याचे चान्सेस

### फसवणूक करुन मते लाटले

लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून मतदारांची फसवणूक करून मते लाटली गेली होती. देशाच्या संविधानाला धोका आहे आणि हा धोका टाळायचा असेल तर राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या उमेदवाराला आपले मत द्यावे. असा प्रचार केला गेला होता.अगदी तसाच प्रचार या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी शरद पवार गट करत आहे. त्यामुळे आता पुन्हा लोकांची फसवणूक होणार नाही. लोकांना फसवून त्यांची मते लाटली जाणार नाहीत. अशी लाट राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या विरोधात निर्माण झाल्याचे दिसते. त्यामुळे मोहन जगताप यांना फटका बसणार असल्याचे चित्र आहे.

### दलितांनो विचार करा...

२९ सप्टेंबर २००६ रोजी भंडारा जिल्ह्यातील मोहाडी तालुक्यातल्या खैरलांजी गावातील दलित भोतमांगे यांच्या कुटुंबातील चौघांची अमानुष हत्या झाली होती. या हत्याकांडाचे पडसाद विधिमंडळापासून संसदेपर्यंत उमटले होते. आंतरराष्ट्रीय स्तरावरही या घटनेची दखल घेण्यात आली. असे असताना शरद पवार सरकारने त्या गावाला तंटामुक्ती गाव पुरस्कार दिला होता. त्यामुळे दलितांनो तुमच्या बद्दल जराही दया-माया नसलेल्या शरद पवार गटाच्या माजलगाव उमेदवारास चुकूनही मत देवू नका? असे आवाहन आंबेडकरी युवकांतून केले जात आहे.

## मुस्लिम समाज वंचितच्या पाठीशी

### अँड. प्रकाश आंबेडकर : मोहम्मद पैगंबर बिल आम्हीच विधान परिषदेत मांडले

दर्यापूर/पुण्यभूमी प्रतिनिधी

सध्या माझ्याबद्दल बरंच सोशल मीडियावर लिहिलं जात आहे की मौलवी, काझीला शिव्या दिल्या वैगेरे. काँग्रेसचे जे भडवे आहेत लिहिणारे ते लिहितील त्याबद्दल मला फरक पडत नाही. मुस्लिम समाज वंचितकडे चालला आहे. मुस्लिम समाज वंचितकडे गेला तर आपलं काय होणार? म्हणून त्यांना आता जड वाटायला लागले असल्याचे वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड. प्रकाश आंबेडकर यांनी दर्यापूर येथील सभेत म्हटले आहे. ते अंकुश वाकपांजर यांच्या प्रचार सभेत बोलत होते.



अँड. आंबेडकर यांनी म्हटले आहे की, नुपूर शर्मा या महिलेच्या विरोधात लोक जेव्हा सुप्रीम कोर्टापर्यंत गेले. त्यावेळी कोर्टाने सांगितले आमचे हात बांधले आहेत, आम्ही काहीच करू शकत नाही. कारण कायदाच नाही. त्यावेळी वंचित बहुजन आघाडीने निवडून आणलेले आमदार कपिल पाटील यांच्या माध्यमातून मोहम्मद पैगंबर यांच्या विरोधात किंवा इथल्या कोणत्याही देव देवतांच्या विरोधात जो कोणी बोलेल त्याला ७ वर्षांची शिक्षा झाली पाहिजे हा कायदा व्हावा म्हणून आम्ही मोहम्मद पैगंबर बिल विधान परिषदेत मांडले.

राज्यात विधानसभेच्या ३२ जागा अशा आहेत. जिथं एकनाथ शिंदे यांचा उमेदवार आणि उध्दव ठाकरे यांचा उमेदवार आणि तिसरा उमेदवार हा वंचित बहुजन आघाडीचा आहे. एकनाथ शिंदे यांची मुस्लिमांप्रती भूमिका भाजपसोबत असल्याने सारखीच आहे. उध्दव ठाकरेंची भूमिका काय ? असा सवालही आंबेडकर यांनी या वेळी उपस्थित केला.ठाकरे आजही जाहीरपणे सांगतात की, पान २ वर...

## परळी पत्रकारांचा निवडणूकीवर बहिष्कार

### योग्य निर्णय: पत्रकारांची बिले थकली

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी तालुक्यातील पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांचा त्यांच्या गेल्या काही वर्षांपासून थकलेल्या बीलांच्या व इतर प्रश्नांमुळे परळी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुक मतदानावर पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांनी बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे लोकशाहीच्या या सर्वात मोठ्या उत्साहात पत्रकार सहभागी होणार नाहीत.



आज दिनांक १५ नोव्हेंबर २०२४ रोजी शहरातील लोकनेते गोपीनाथराव मुंडे पत्रकार भवन येथे विविध वर्तमानपत्रांचे संपादक पत्रकार आदी उपस्थित होते यावेळी गेल्या अनेक वर्षापासून विविध राजकीय पक्षांच्या नेत्याकडे पत्रकारांच्या जाहिरातीचे बीले थकलेली आहेत. जाहिरात बीलां संदर्भात वर्तमानपत्रांच्या संपादकांचा पत्रकारांना सतत मागोवा घेण्यासंदर्भात पाठपुरावा केला जातो. परंतु बीले काही दिले जात नाहीत. लोकसभा निवडणुकीतही आश्वासन मिळाले परंतु आता विधानसभा निवडणुकीचा प्रचारही अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेला आहे. अद्याप पत्रकारांची दखल घेण्यात आलेली नाही. त्यामुळे उद्विग्न होऊन सर्व संपादक व पत्रकारांनी परळी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीवर बहिष्कार पान २ वर...

## तर मी राजकारणातून निवृत्ती घेईन

### राजकीय:उद्धव ठाकरेंचे भावनिक आवाहन

औरंगाबाद/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगरची जागा वगळता इतर सर्व ठिकाणी महाविकास आघाडीचा विजय झाला होता. छत्रपती संभाजीनगरचा पराभव हा शिवसेना (ठाकरे) पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांच्या चांगलाच जिव्हारी लागल्याचे दिसत आहे. नुकतीच शिवसेनीच छत्रपती संभाजीनगरमध्ये जाहीर सभा झाली. या सभेत ठाकरे यांनी जनतेला भावनिक आवाहन केले. मोदी आणि शाह हे मला घरी बसवू शकत नाहीत. पण जेव्हा जनता ठरवेल, तेव्हा मी घरी बसेन, असे उद्धव ठाकरे म्हणाले.छत्रपती संभाजीनगर (पूर्वीचा औरंगाबाद) हा फार पूर्वीपासून शिवसेना पक्षाचा गड राहिला आहे. मात्र यावेळी लोकसभेत पान २ वर...



## दया दाल मे कुछ काला हैं!

### चर्चा : शरद पवारांकडून देवेंद्र फडणवीस यांचं कौतुक

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहचला आहे. अवघ्या पाच दिवसांत महाराष्ट्राची निवडणूक पार पडणार आहे. यावेळी महाराष्ट्रात महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा सामना आहे. महायुतीमध्ये भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे), राष्ट्रवादी (अजित पवार) असे तीन पक्ष आहेत. तर महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) आणि शिवसेना (उद्धव ठाकरे) असे तीन पक्ष आहेत. तसंच राज ठाकरेंच्या मनसेनेही उमेदवार मैदानात उतरवले आहेत. दरम्यान शरद पवार यांनी देवेंद्र फडणवीस यांचं कौतुक केलं आहे. इतरही घडामोडींवर त्यांनी भाष्य केलं आहे.शरद पवारांना विचारण्यात आलं की काही जण म्हणत आहेत की ही तुमची शेवटची निवडणूक आहे. त्यावर शरद पवार म्हणाले, कुणी काहीही म्हणो, जोपर्यंत मी काम करु शकतो, हिंडू शकतो, फिरु शकतो तोपर्यंत मी काम करत राहणार. मी थेट निवडणुकीच्या प्रक्रियेत नाही असं मी म्हटल्याने सगळ्या चर्चा सुरु झाल्या. १९६७ ला मी पहिली निवडणूक त्यानंतर सतत मी कुठल्या ना कुठल्यातरी सदनात आहे. ५६ वर्षांपासून मी राज्य किंवा देशाच्या राजकारणात आहे. मला एकही दिवस ब्रेक मिळालेला नाही. त्यामुळे मी असं ठरवलं की थेट लोकसभेची निवडणूक लढवायची नाही. राज्यसभेत मी आहे. प्रत्यक्ष निवडणुकीला उभं राहणं, लोकांकडून स्वत:साठी मतं मागणं हे मी करणार नाही असं ठरवलं आहे. मी पक्षाचं काम करणार आहे असं शरद पवार म्हणाले.मी आणि अजित पवार एकत्र होतो पान २ वर...



#### सुप्रियाला लोकांनी निवडून दिलं-शरद पवार

लोकसभेच्या निवडणुकीत अजित पवारांनी त्यांच्या पत्नीला उभं केलं. सुप्रियाला आम्ही उभं केलं होतं. तिचा संसदेतला परफॉर्मन्स चांगला आहे. बारामती आणि तिथल्या लोकांनी सुप्रियाच्या बाजूने निर्णय दिला असंही लोकसभा निवडणुकीबाबत शरद पवार यांनी म्हटलं आहे. एनडीटीव्ही मराठीला दिलेल्या मुलाखतीत शरद पवार यांनी हे भाष्य केलं आहे.

## गोलमाल बाबरी मुंडे, देणार रमेश आडसकरांना पाठिंबा?

# दादा लोकांना पाडण्यासाठी डावपेच!



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव मतदार संघाची निवडणूक जसजशी जवळ येत आहे.अगदी तस तसा ट्विस्ट वाढत चालला आहे. कोणत्याही परिस्थितीत दादा लोक निवडून येता कामा नयेत, त्यासाठी डावपेच आखले जात आहेत. माजलगाव मतदार संघात अशी स्थिती निर्माण होण्याचे प्रमुख कारण म्हणजे पंकजा मुंडे यांचा लोकसभेत झालेला निसटता पराभव म्हणावा लागेल. त्यामुळे येत्या दोन दिवसात माजलगाव मतदार संघात वेगळे चित्र असणार आहे. कदाचित दादा लोकांना अडविण्यासाठी अपक्ष उमेदवार बाबरी मुंडे, मोठा निर्णय घेऊ शकतात. त्यामध्ये रमेश आडसकर यांना पाठिंबा देणार असल्याची चर्चा असून तसे झाले तर दादा लोकांचा दारुण पराभव होईल. असे मत जाणकार व्यक्त करु लागले आहेत.

माजलगाव मतदार संघात भाजपकडून उमेदवारी मिळण्यासाठी बाबरी मुंडे यांनी पूर्ण ताकद पणाला लावली होती. परंतु पक्षाकडून त्यांना उमेदवारी देण्यात आली नाही. त्यामुळे नाराज झालेले बाबरी मुंडे अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढविण्यावर ठाम होते. त्यानंतर त्यांनी एखाद्या पान २ वर...

### उमेदवारांचा जीव भांड्यात

जिल्ह्यातील सहाही मतदार संघात उभा असलेल्या उमेदवारांमध्ये प्रचंड अस्वस्थता आहे. कारण कोण निवडून येईल आणि कोण येणार नाही. याचा अंदाज बांधणे नेत्यांनाही कठीण झाले आहे.कारण राज्याच्या राजकारणात उलथापालत झाल्याने जिल्ह्याचे राजकारण तेवढेच ढवळून निघाले आहे. मातब्बर देखील गरीब गाई सारखे मताचा जोगवा मागत आहेत. परंतु कोणत्या पोतराजाला मताचा जोगवा मिळणार आहे हे येत्या काळातच स्पष्ट होईल.



भावपूर्ण श्रद्धांजली
नमो बुध्दाय ! जय भिम !!
|| धम्मचारी सुखं सेति, अस्मिं लोके परिम्हिच ||
स.न.स.जयभिम आपणांस
कळविण्यात येते की,
कालकथीत मधुकर फकिरा बनसोडे यांचे
प्रथम स्मृतिदिन
(पुण्यस्मरण)
रविवार दि. १७/११/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा.
हरेगांव ग्रामपंचायतजवळ, बुद्धविहार, हरेगांव, ता.श्रीरामपूर
येथे होणार आहे. तरी याप्रसंगी आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.
-आपले विनित-
समस्त बनसोडे परिवार,
हरेगांव संपर्क क्र. ९६८९९६९९८१
धम्मदेशना - भंते मोग्गलायन (परभणी)



## नक्की काय बुलडोझ झाले?

उपयुक्ततेचे सामर्थ्य अंगी असलेल्यास उपद्रवशक्तीचे प्रदर्शन घडवण्याचा मोह होणे नैसर्गिक. स्वत:चे सामर्थ्य असे प्रदर्शित करण्याची प्रेरणा ही आदिम. त्यातूनच रॉबिनहूडसारख्या व्यक्तिरेखांचा जन्म होतो. तत्त्ववेत्ता प्लेटो याने 'रिपब्लिक' ही संकल्पना मांडल्यानंतर आणि यथावकाश ती प्रत्यक्षात आल्यानंतर या रॉबिनहुडांस कायमची मूठमाती दिली जाणे आवश्यक होते. विकसित देशात ते झाले. त्या देशांनी ही मूठमाती दिली म्हणून ते विकसित होऊ शकले. पण अविकसितांस ते जमले नाही. या अविकसित देशांत संस्थात्मक उभारणी मुळातच दुबळी. आपण यातलेच. परिणामी प्रांतोप्रांती रॉबिनहुडांचे पेव अजूनही फुटते. गुन्हेगारांस तेथल्या तेथे शासन करणे आणि कथित न्याय करणे हे रॉबिनहुडी वैशिष्ट्य. आपल्याकडे विविध पातळ्यांवर विविधरंगी, विविधपंथी, विविधधर्मी झगे घातलेले असे रॉबिनहूड खूप निपजले. कार्यक्षम न्यायव्यवस्थेस दुरावलेल्या आणि सामर्थ्यवानांकडून चेपल्या जाणाऱ्या समाजात अशा रॉबिनहुडांचे आकर्षण फार. आपण जे करू शकत नाही, ते हे रॉबिनहूड करतात आणि आपणास न्याय देतात (?) म्हणून सामान्यजन खूश. इतके दिवस हे रॉबिनहूड कधी सत्तेत नव्हते. सत्तेच्या, व्यवस्थेच्या परिघाबाहेर त्यांचे वास्तव्य, कार्यक्षेत्र असे आणि सत्ताधाऱ्यांच्या आसऱ्याने, मदतीने ते आपले कथित न्यायदान पार पाडत. काही प्रमाणात हे सत्ताधीशांसही सोयीचे होते. जे आपणास करणे शक्य होत नाही ते सत्ताधीशांस या व्यवस्थाबाह्य रॉबिनहुडांहस्ते करून घेता येत असे. प्रश्न निर्माण झाला हे रॉबिनहुडी विधिवत सत्तेत येऊन अधिकृत पदी बसू लागले तेव्हा. 'बुलडोझर न्याय' हे या रॉबिनहुडांच्या सत्ताकारणाचे प्रतीक. नियमाधारित लोकशाही ही वेळखाऊ असते कारण त्यात सर्व संबंधित घटकांस पुरेसा वेळ द्यावा लागतो. त्यापेक्षा 'बुलडोझर न्याय' हा अधिक सुलभ आणि जनस्नेही. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या अतिशय मुद्देसूद आणि सविस्तर निकालांद्वारे असे बुलडोझर न्याय करणाऱ्या विद्यामान आणि भावी बाबांच्या मनसुब्यांवर बुलडोझर फिरवला. त्याची दखल घ्यायला हवी.कारण या बुलडोझर न्यायदानाचे लोण, अन्य अनेक प्रतिगामी प्रथा/ परंपरा/ रिवाजांप्रमाणे उत्तरेतून दक्षिणेकडे पसरू लागले होते. यात उत्तर प्रदेशच्या भगव्या वस्त्रांकित मुख्यमंत्र्यांनी बुलडोझर न्यायास धर्मकृत्याचा दर्जा देण्याचे पुण्य मिळवले. महाराष्ट्रासारख्या प्रशासन आदर्शासाठी (अर्थातच एके काळी) ओळखल्या जाणाऱ्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांसही बुलडोझर मखरात बसण्याचा मोह झाला. त्यात ते नवहिंदुत्ववादी आणि अशा रॉबिनहुडी व्यक्तिमत्त्वाचे पट्टशिष्य. मग तर पाहायलाच नको. त्या सर्वांस सर्वोच्च न्यायालयाच्या न्या. भूषण गवई आणि न्या. विश्वनाथन यांच्या पीठाने चांगलाच चाप लावला. 'प्रशासनाने न्यायदानाचा उद्योग करू नये', असे सर्वोच्च न्यायालय या आदेशात खडसावते. एखाद्याचे घर/बांधकाम बेकायदेशीर आहे असा निर्णय स्वत:च घ्यायचा आणि स्वत:च्या अधिकारातील सरकारी यंत्रणा हाताशी धरून हे घर/बांधकाम बुलडोझर लावून पाडून टाकायचे. यातील काही घरे विविध आंदोलनांत सरकारविरोधी निदर्शनांत सरकारी संपत्तीचे कथित नुकसान करणाऱ्यांची होती. त्यांनी सरकारी मालमत्तेचे नुकसान केले म्हणून मग कार्यक्षम प्रशासनाने त्यांची घरे पाडली. जशास तसे हा रस्त्यावरचा न्याय झाला. सरकारने असे वागायचे नसते. सूड घेणे हे लोककल्याणकारी सरकारास शोभत नाही. तेच नेमके अनेक राज्यांनी केले.रॉबिनहुडी वृत्तीत नुसता अधिकार गाजवणे पुरेसे नसते. अधिकार गाजवण्याचे प्रदर्शन अधिकार प्रस्थापनासाठी आणि त्याहीपेक्षा अधिक दहशत निर्मितीसाठी गरजेचे असते. बुलडोझर बाबांनी त्यामुळे आपल्या बुलडोझरी उद्योगांचे प्रदर्शन मांडले. अलीकडे कोणत्याही वेडाचारास प्रसिद्धी देण्यासाठी माध्यमे उतावीळ असतात. त्यामुळे या रॉबिनहुडी कृत्यांस प्रसिद्धी मिळून दहशत पसरण्यास मदत झाली. दुसरा मुद्दा असा की घर ही केवळ विटा–सिमेंट यांनी बनलेली रचना नसते. त्यात भावना असतात आणि या भूतलावरचे ते स्वत:चे असे हक्काचे स्थान असते. त्यामुळे सरकार दांडगाई करून घरे जमीनदोस्त करते तेव्हा या सगळ्याचाही चुराडा होऊन व्यक्तीचा स्वत:चा पैस नाहीसा होतो. शिवाय अशा घरातील एकाच्या कृत्यासाठी जेव्हा अन्यांस शासन केले जाते तेव्हा तो सरकारने स्वत:च्याच नागरिकांवर केलेला अत्याचारच असतो. एकाच्या कथित चुकीसाठी वा अयोग्य कृतीसाठी त्या व्यक्तींशी संबंधित इतरांस शासन करणे ही झुंडशाही झाली. म्हणून सर्वोच्च न्यायालय निवडून आलेल्या सरकारची ही कृत्ये जेव्हा 'घटनाबाह्य' ठरवते तेव्हा ती बाब महत्त्वाची आणि दूरगामी ठरते. ''आपल्या या आदेशाचा कोणत्याही पद्धतीने भंग झाल्यास तो न्यायालयाचा अवमान मानला जाईल आणि तो करणाऱ्यास कठोर शासन केले जाईल,'' असे सर्वोच्च न्यायालय या निकालात बजावते. असे झाल्यास ही बुलडोझरी रॉबिनहूडगिरी करणाऱ्यास स्वत:च्या खर्चाने सदर नुकसान भरून 'सरकारी कारवाईचा बळी ठरलेल्यास' नुकसानभरपाईही अदा करावी लागेल. तेव्हा सर्वोच्च न्यायालयाच्या या कृतीचे स्वागत.ते करताना प्रश्न असा की याचा आता उपयोग काय? हा प्रश्न विचारण्यामागे अनेक कारणे. जून महिन्याच्या २७ तारखेस उत्तर प्रदेशातील बरेली येथील एका इसमाचा १२ खोल्यांचा बंगला त्या राज्याच्या सरकारने पाडला. हे कृत्य ज्यांनी केले त्यांनीच पुढे आणखी १४ जणांची घरे पाडली. त्यामागे कारण होते मोहरमच्या मिरवणुकीत झालेला हिंसाचार. शेजारच्या मोरादाबादेतील एका इसमाचे घरही असेच पाडले गेले. कारण? त्यातील एका व्यक्तीचा कथित घरफोडीत सहभाग असल्याचा संशय. असे अन्य अनेक दाखले देता येतील. या घरांतील सर्व माणसे सरकारने आपल्या कृत्याने रस्त्यावर आणली. ज्यांनी कथित गैरकृत्यात भाग घेतला त्यांच्यावरचे आरोप सिद्ध होण्याआधीच सरकारने ही आततायी कारवाई केली. एखाद्यावरील आरोप सिद्ध होणे, न्यायालयाने त्यासाठी त्यास दोषी ठरवणे इत्यादी काहीही प्रक्रिया पार न पाडता सरकारने हा झटपट न्यायाचा मार्ग निवडला. या अशा हुच्चपणाचे राजकीय फायदे दिसतात असे आढळल्यावर हे रॉबिनहुडी राजकारणी अन्य राज्यांतही हाच मार्ग निवडू लागले. महाराष्ट्रातही मुख्यमंत्र्यांस 'महाराष्ट्राचा बुलडोझर बाबा' असे प्रमाणपत्र देण्याचा प्रयत्न मुख्यमंत्र्यांच्या पक्षातील अर्धवटरावांनी केला. अशा वेळी या बुलडोझरी राजकारण्यांस आळा घालणे आवश्यकच होते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने हे होईल.पण ही कृती 'बैल गेला आणि झोपा केला' अशी असल्याची टीका कोणी केल्यास ती गैरलागू ठरणार नाही. उत्तर भारतातील एक निवडणूक 'बुलडोझर बाबां'नी या मुद्द्यावर लढवली. त्याचे इतके स्तोम माजले की त्यांच्या निवडणूक प्रचारात हे मठ्ठ दिसणारे बुलडोझर तैनात केले जाऊ लागले.

# म्हणून आरक्षण उपवर्गीकरण ?

आरक्षणाच्या मुद्द्यावरून गेल्या अनेक महिन्यांपासून महाराष्ट्र धगधगतोय. त्याचा परिणाम राजकारणावर सुद्धा झालेला आहे. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत आरक्षणाच्या मागणीचा परिणाम महाराष्ट्रात दिसला. मुख्यतः मराठवाड्यामध्ये बहुतकरून परिणाम जाणवला. सध्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना, महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत सुद्धा मराठा आरक्षण मुद्दा राजकारणात परिणामकारक ठरणार आहे. आरक्षणाची मागणी गुजरात , राजस्थान राज्यानंतर महाराष्ट्रामध्ये तीव्रतेने दिसून आली. गुजरातच्या गुर्जर समाजाची आरक्षणाची मागणी हाताळण्यामध्ये यश आले तर राजस्थान मधील जाट समाजाच्या आरक्षणाची मागणी हाताळण्यात भाजप सरकारला यश आले. मात्र ,महाराष्ट्रातील मराठा आरक्षणाची मागणी सरकारला हाताळता आली नाही हे भाजपच्या महाराष्ट्रातील लोकसभेच्या जागा घटल्यावरून लक्षात येते. मराठा आरक्षण राज्यात धगधगत असताना, एससी आरक्षण उपवर्गीकरण करण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. या निर्णयात राज्यांना आरक्षण उपवर्गीकरण करण्याचा अधिकार असल्याचे म्हटले गेले. यावरून, भारत बंदची हाकही देण्यात आली. परंतु , महाराष्ट्रातील अनुसूचित जातींमध्ये आरक्षण उपवर्गीकरण संदर्भात नेमकी भूमिका अजूनही आंबेडकरी व अनुसूचित जाती समाजात अस्पष्ट दिसते. याबाबत महाराष्ट्रातील काही म्होरके असणाऱ्या पुढाऱ्यांनी उपवर्गीकरण करण्याला मूक राहून तर बोलून सहमती दर्शवली आहे. याची कारणे वेगवेगळी असू शकतात. यात दुमत नाही. परंतु, आरक्षण उपवर्गीकरण करण्याचा निर्णय हा अनुसूचित जातीमध्ये फूट पाडण्याचा आणि त्यातील विशिष्ट जात समूहांना सोबत घेऊन राजकारण करण्याचा घाट समजलेला नाही. असे म्हणावे लागेल तसेच प्रस्थापित पक्षांनी सुद्धा आरक्षण उपवर्गीकरणाबाबत चुप्पी धरलेली आहे. हे वेगळं सांगण्याची गरज नाही. भाजपेतर किंवा एनडीए चा घटक नसलेल्या पक्षांनी सुद्धा आरक्षण उपवर्गीकरणाबाबत भुमिका स्पष्ट




केलेली नाही. याबाबत अनुसूचित जातीमध्ये वेगवेगळे मतप्रवाह असून, अनुसूचित जातीमध्ये यामुळे फूट पडणार नाही तर ज्यांच्या पर्यंत आरक्षण गेले नाही त्यांना आरक्षणाचा लाभ होईल असा मतप्रवाह आहे तर दुसरीकडे आरक्षण संपवण्याचा घाट आणि अनुसूचित जातीमध्ये फूट पाडली जात आहे असे दोन मतप्रवाह सध्या अनुसूचित जाती मधील बुद्धिवंतांमध्ये दिसून येते. मूळतः ज्यांच्या पर्यंत आरक्षण पोहोचले नाही त्यांच्यासाठी उपवर्गीकरण करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने समिती नेमण्याचा निर्णय घेतला असला तरी, आरक्षण अनुसूचित जातींमधील केवळ काही जातींनाच घेता येते अशी तरतूद आहे का?हा प्रश्न. आरक्षण उपवर्गीकरण विरोधातील व्यक्तींना पडला आहे. अनुसूचित जातीमध्ये विशिष्ट जातींनी आरक्षणाचा लाभ घ्यावा. अशी कुठलीही तरतूद नसताना, अनुसूचित जातींमधील एकतेत खंड करण्याचा हा निर्णय नव्हे काय? असाही प्रश्न सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे उपस्थित होतो. आरक्षण उपवर्गीकरण करून, आरक्षणातही दुफळी निर्माण करून , बहुजनांचे राजकीय नेतृत्व उभे राहू नये.जर राहिले तर अनुसूचित जातींमधील केवळ काही जाती जुडल्या जातील आणि त्यामुळे राजकीय नेतृत्व उभे करण्याची पोकळी यामुळे निर्माण होईल.जर केवळ अनुसूचित जाती एकत्रित राहिल्या तरी बहुजनांची राजकीय ताकद इतरांच्या पथ्यावर पडेल.तर अनुसूचित जाती –जमाती आणि थोडेबहुत ओबीसी जवळ केले तर बहुजन समाज सत्तेत निर्णायक ठरू शकतो. पण, बहुजन समाज सत्तेपासून कसा दूर राहील याची व्यहरचना म्हणजे आरक्षण उपवर्गीकरण. राजकीय नेतृत्व संपवण्यातही आरक्षण उपवर्गीकरणचा घाट आहे. सर्वोच्च न्यायालयाने ही जबाबदारी राज्यावर सोपवली असली तरी याची किती राज्य अंमलबजावणी करतात यावर आंबेडकरी, बहुजन राजकीय नेतृत्व संपविण्यात हातभार लागेल. आता अनुसूचित जाती आरक्षित जागांसाठी बौद्ध किंवा महार जातीला प्रतिनिधी किती मिळते?याऊलट इतर जातींना राजकीय पक्ष प्रतिनिधीत्व देतात.आरक्षित जागांसाठी बौद्ध/महार उमेदवार दिला तर इतर समाज मत करीत नाही , यात अनुसूचित जातींमधील सुध्दा. त्यामुळे राजकीय पक्ष इतर जातीतील उमेदवार आरक्षित जागी शोधतात. एखादा अपवाद वगळता.ही वस्तुस्थिती असून, आंबेडकरवादी विचारांचा उमेदवार राजकीय पक्षांना चालत नाही.याला उपवर्गीकरण हा दुजोरा.



पदमाकर उखळीकर,
मो.९९७५१८८९१२

यावरून फुले –शाहू – आंबेडकरांना मानणारा वर्ग किंवा राजकीय पक्ष किती आहेत.याचे वास्तव दर्शनी चित्र.त्या उमेदवाराला केवळ आरक्षित जागांसाठी नाही तर राजकीय नेतृत्व संपविण्यात आरक्षण उपवर्गीकरण महत्त्वाचे ठरणार आहे आणि ती संधी अंमलबजावणी करणारी राज्य सोडणार नाहीत.पण, अनुसूचित जातींचा समुह याचा विचार कितपत करणार आहेत ?हा येणारा काळ ठरवेल.त्यामुळे जाती –जातीत भेद निर्माण करून, एका दगडात दोन पक्षी मारण्याची प्रकिया म्हणजे थोडक्यात आरक्षण उपवर्गीकरण.

## पान एक वरून

**मुस्लिम समाज वंचितच्या**

माझ्या शिवसैनिकांनी बाबरी मशीद शहीद केली त्याबद्दल मला अभिमान आहे. मी मुस्लिमांना विचारतो लोकसभेत संविधानाच्या मुद्द्यावर तुम्ही त्यांना मतदान दिले, पण आता काय आहे ? तुम्ही ज्यांचे स्मरण करून नमाज अदा करता त्या मोहम्मद पैगंबर यांचं बिल येत असेल आणि ते बिल वंचित बहुजन आघाडी आणत असेल तर तुम्ही वंचितला का मतदान करत नाहीत? असा सवाल त्यांनी मुस्लिमांना केला आहे.मुस्लिम समाजाने एक लक्षात घ्यावं की, दंगल करायची असेल तेव्हा एक तर मशीदचा वापर केला जातो किंवा मोहम्मद पैगंबर यांचा वापर केला जातो. त्यांच्या विरोधात लिहिलं जातं. आपल्याला माहीत आहे की, नुपूर शर्मा नावाच्या महिलेने काय वक्तव्य केले होते. मी मुस्लिम समाजाला सांगू इच्छितो की, हे घडत राहणार आहे. तुम्ही वाईटच आहात हा स्टॅम्प तुमच्यावर मारला जाणार आणि यातून बाहेर पडायचं असेल, तर वंचित बहुजन आघाडीने आखलेला मार्ग तुम्ही स्वीकारला पाहिजे, असे आवाहन त्यांनी या वेळी केले

**परळी पत्रकारांचा निवडणूकीवर**

घालण्याचा एकमुखी ठराव घेतलेला आहे. यामध्ये पत्रकारांचे कुटुंबीयही सहभागी आहेत. या निवेदनावर संपादक आत्मलिंग शेटे, ज्येष्ठ पत्रकार रामप्रसाद शर्मा, संपादक रानबा गायकवाड, ज्येष्ठ पत्रकार धनंजय अरबुने, संपादक मोहन वाव्हळे, पत्रकार प्रा. प्रवीण फुटके , प्राध्यापक रवींद्र जोशी, संपादक बालासाहेब फड,पत्रकार धनंजय आढाव, पत्रकार प्रकाश चव्हाण, पत्रकार जगदीश शिंदे, पत्रकार दत्तात्रय काळे, पत्रकार माणिक कोकाटे, पत्रकार समीर इनामदार, पत्रकार पद्माकर उखळीकर,पत्रकार महादेव शिंदे, पत्रकार धीरज जंगले, पत्रकार प्रा. दशरथ रोडे, पत्रकार किरण धोंड, पत्रकार विकास वाघमारे, पत्रकार श्रीराम लांडगे, पत्रकार गणेश आदोडे, संपादक बालाजी जगतकर पत्रकार भगवान साकसमुद्रे, संपादक बालाजी ढगे, संपादक कैलास डुमणे, संपादक अभिमान मस्के,पत्रकार संतोष बारटक्के, पत्रकार महादेव गीते,पत्रकार बाबा शेख, संपादक नितीन ढाकणे, पत्रकार अमोल सूर्यवंशी, पत्रकार प्रकाश वर्मा, पत्रकार शेख मुकरम, पत्रकार संदीप मस्के, पत्रकार विजय रोडे, पत्रकार बालासाहेब मुजमुले आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**दया दाल मे कुछ काला**

त्यावेळी आम्ही निर्णय घेतला होता की लोकसभा लढवून मी दिल्लीत जाणार तर महाराष्ट्रातलं काम हे अजितने बघायचं. साखर कारखाने, सहकारी संस्था या सगळ्या गोष्टींची जबाबदारी, समाजकारण, राजकारण याच्याशी संबंधित सगळ्यांचा अधिकार मी त्यांच्या हाती दिला होता. पक्ष संघटनेतही कुणी असावं याचा निर्णय घेण्याचा अधिकार त्यांना होता. आम्ही जो विचार स्वीकारला त्यात ते (अजित पवार) होते. मी राजकारणात उतरुन जो विचार सांभाळला, भाजपाशी संघर्ष केला त्यात ते होते. आज अजित पवार दुसऱ्या रस्त्याने गेले आहेत. आम्हाला वैचारिकदृष्ट्या ती मान्य नाही. त्यामुळे आम्हाला आमच्या मार्गाने जाण्याशिवाय पर्याय नाही असं शरद पवार म्हणाले.

**तर मी राजकारणातून निवृत्ती**

इथे शिवसेना (शिंदे) पक्षाचे संदीपान भुमरे यांचा विजय झाला. छत्रपती संभाजीनगर लोकसभेत जिल्ह्यातील पैठण, सिल्लोड, औरंगाबाद मध्य, औरंगाबाद पश्चिम आणि वैजापूर हे पाच विधानसभा मतदारसंघ येतात. उद्धव ठाकरे यांनी याठिकाणी भावनिक आवाहन करून जनतेला आपल्या बाजूने करण्याचा प्रयत्न केला आहे. उद्धव ठाकरे आपल्या भाषणात म्हणाले, ही निवडणूक महाराष्ट्र प्रेमी आणि महाराष्ट्र द्रोही यांच्यात होत आहे. लोकसभेत दुर्दैवाने आमचा पराभव झाला. तो कसा झाला आणि का झाला? याचे उत्तर कोण देणार? मविआच्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात मी प्रामाणिकपणे केलेला कारभार तुम्हाला आवडला नाही का? माझे नेतृत्व तुम्हाला पसंत नाही का? असा सवाल यावेळी उद्धव ठाकरे यांनी विचारला. नसेल तर नाही सांगा. मला मोदी आणि शाह घरी नाही बसवू शकत. ज्यादिवशी तुम्ही मला सांगाल घरी बस त्यादिवशी क्षणार्धात घरी बसेन. पण जोपर्यंत तुम्ही मला लढण्यास सांगत आहात, तोपर्यंत माझ्या वाटेत कुणीही आले, प्राण गेले तरी बेहत्तर पण जिंकून दाखविल्याशिवाय राहणार नाही.२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत संयुक्त शिवसेना आणि भाजपाने औरंगाबाद जिल्ह्यातील सर्व नऊ जागांवर विजय प्राप्त केला होता. भाजपाने फुलंब्री (हरीभाऊ बागडे), गंगापूर (प्रशांत बंब) आणि औरंगाबाद पूर्व (अतुल सावे) यांनी विजय मिळविला होता. तर संयुक्त शिवसेनेने कन्नड (उदयसिंह राजपूत), सिल्लोड (अब्दुल सत्तार), औरंगाबाद मध्य (प्रदीप जैस्वाल), औरंगाबाद पश्चिम (संजय शिरसाट), पैठण (संदीपान भुमरे) आणि वैजापूर (रमेश बोरणाले) यांचा विजय झाला होता. उदयसिंह राजपूत वगळता इतर पाचही आमदारांनी एकनाथ शिंदे यांची साथ दिली आहे.

**दादा लोकांना पाडण्यासाठी**

पक्षाची उमेदवारी आपल्याला मिळावी यासाठी अनेकांकडे चर्चाही केली. परंतु तिथेही त्यांना फारसे यश आले नाही. शेवटी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करून निवडणूक रिंगणात उभा आहेत. खरंतर पंकजा मुंडे यांचे खंदे समर्थक म्हणून बाबरी मुंडे यांच्याकडे पाहिले जाते. पंकजा मुंडे यांचा एक शब्द बाबरी मुंडे यांना अंतिम आहे. माजलगाव मतदार संघात महायुतीकडून ऐनवेळी जयसिंग सोळंके यांना डावलून प्रकाश सोळंके यांना उमेदवारी देण्यात आली. असे असताना बाबरी मुंडे महायुती उमेदवाराच्या विरोधात बंडखोर उमेदवार म्हणून उभा राहिले. पंकजा मुंडे यांनी ठरविले असते तर बाबरी मुंडे यांनी नक्कीच माघार घेतली असती. परंतु पंकजा मुंडे देखील बाबरी मुंडे यांना पुढे करून राजकीय खेळी करत असल्याचे पुन्हा स्पष्ट झाले आहे, असेच म्हणावे लागेल. गेल्या चार दिवसांपूर्वी बाबरी मुंडे यांनी माजलगाव शहरात शक्ती प्रदर्शन करून सभा घेतली होती. या सभेतील भाषणाचा रोख नेमका कोणत्या दादाकडे आहे हे सर्व जिल्ह्याने ऐकले. त्यामुळे बाबरी मुंडे यांना निवडून येण्याचे दु:ख कदापी असणार नाही. परंतु दादा लोक निवडून आले तर आपली हार आहे. त्यामुळे कदाचित ऐनवेळी अपक्ष उमेदवार रमेश आडसकर यांना पाठिंबा जाहीर करून माजलगावच्या राजकारणात खळबळ उडून देतील अशा चर्चांना उधाण आले आहे. बाबरी मुंडे यांनी माजलगाव शहरात काढलेल्या रॅलीत स्वर्गीय लोकनेते गोपीनाथ मुंडे, धनंजय मुंडे, आणि पंकजा मुंडे यांचे फोटो दिसून आले. त्यामुळे बाबरी मुंडे यांच्याकडून करेक्ट कार्यक्रम कोणाचा होणार आहे. हे येणाऱ्या काळात दिसून येईल मात्र त्यापूर्वी माजलगावच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याचे संकेत आहेत.

## पान सहा वरून

**बेकायदा जुगार अड्ड्यावर**

तोडपाणी करून सोडून देण्यात आल्याची खात्रीलायक माहिती सध्या चर्चिली जात आहे. सध्या सगळीकडे आचारसंहिता चालू असून अनेक भागात चालू असणाऱ्या अवैध व्यवसायाला चाप बसवण्याची गरज असल्याचे लोकांत बोलले जात आहे, यावरून तरी गेवराई परिसरातील अवैध व्यवसायाला चाप बसला पाहिजे, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

**केजमध्ये भुरटे पुढारी**

उपस्थित होतो आहे मागिल काही दिवसांपूर्वी नमीता लोखंडे यांना अरे तुरे ची भाषा वापरणारे केज तालुक्यातील भुरटे पुढारी आता नमीता लोखंडे यांच्या पायावर लोटांगण घेत आहेत यांचे कारण असे आहे की त्या भुरट्या पुढाऱ्यांना नमीता लोखंडे यांनी खोके पुरविले आहेस का असा प्रश्न उपस्थित होतो आहे म्हणून नमीता लोखंडे यांच्या कडुन खोके म्हणजेच पॅकेज घेऊन केज तालुक्यातील बोके झाले नमीता लोखंडे यांचा प्रचार करण्यासाठी ओके असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

**मतदान, मतमोजणीच्या**

वगळून पाच किंवा पाचपेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. परंतु जे मतदार मतदानासाठी मतदान केंद्राच्या ठिकाणी रांगेत उभे असतील त्यांना आदेश लागू राहणार नाही.मतदान केंद्र परिसरात ध्वनीक्षेपक वापरास, वाद्य वाजविण्यास व मिरवणुका काढण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. मतदान केंद्राच्या १०० मीटरच्या आत व मतमोजणी केंद्राच्या २०० मीटरच्या आत संबंधित पक्षाचे उमेदवाराचे चिन्हांचे प्रदर्शन करण्यास व निवडणूक कामकाजासाठी नियुक्त असलेल्या अधिकारी, कर्मचारी व मतदान करण्यासाठी आलेल्या व्यक्तींव्यतिरिक्त इतर व्यक्तींना वैध ओळखपत्र असल्याशिवाय प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. सदर आदेश निवडणुकीच्या कामकाजासाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाहीत, असेही आदेशात नमूद केलेले आहे.

**बीडमध्ये बदल घडविण्यासाठी**

नेतृत्व म्हणून सर्व परिचित असलेले उमेदवार अनिल जगताप यांना ओबीसीतील विविध समाजाती लोकांनी निवडून आणण्यासाठी आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे .बीड विधानसभा मतदारसंघातील शहर, खेड्यापाड्यात जाऊन सर्वांनी आपापल्या समाजातील समाज बांधवांना अनिल दादा जगताप यांना निवडून देण्यासाठीएकजुटीने मतदान करावे अशी आग्रहाची विनंती करत प्रचाराची धुरा ओबीसी समाज बांधवांनी सांभाळली आहे. ओबीसी समाजाने घेतलेल्या या भूमिकेमुळे अनिल दादा जगताप यांची बाजू भक्कम झाली असून विजय निश्चित मानला जात असल्याची चर्चा सुरू झाली आहे.याप्रसंगी माळी समाजाचे लक्ष्मण दादा ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली ओबीसी क्रांति परिषद राष्ट्रीय अध्यक्ष किरण चव्हाण, आलोक फटाले, मनोज उर्फ राजाभाऊ चव्हाण, नावी समाज मधुकर वैद्य, संजीव भारती हे परिश्रम घेत आहेत.

**भावनिक करुन मते मिळवायची**

जनतेला वेड्यात कढुन मते खाउन निवडणूक लढवताता अक्षय मुंदडा यांचे असे झाले आहे जिकडले खाईल मटन तीकडच रात्रभर नटन असा कारभार अक्षय मुंदडाचा झाला आहे . त्यामुळे अक्षय मुंदडा आजपर्यंत कीती जनाला सोडले धरले मग तुम्ही आ.पंकजाताईला सोडणार नाही कशावरून व २०२४ ला मुंडे समर्थकांना भावनिक करुन मते मिळवायची आहेत असा प्रश्न नागरिकांना पडला आहे भावना व्यक्त केल्या जात आहेत.

**चला लोकशाही बळकट**

होऊन वयोवृद्ध व दिव्यांग मतदारांची मतदान प्रक्रिया पार पाडली. सदर मतदान प्रक्रियेची सुरुवात आज दिनांक १४ /११/ २०२४ रोजी सकाळी ८.३० वाजता करण्यात आली व सर्व प्रथम रुक्मिना पन्नालाल बाहेती यांनी आमच्या प्रतिनिधी समक्ष मतदानाचा हक्क बजावला. निवडणूक आयोगाच्या निर्णयामुळे व निवडणूक अधिकाऱ्यांच्या टीमच्या सेवेमुळे मतदार अतिशय प्रसन्नित व खुश आहे.

**रेणुका यात्रेत रंगणार कुस्त्यांचा**

व्यवस्था असल्याचे सांगण्यात आले. पंचक्रोशीतील भाविक व पैलवानांनी लाभ घेण्याचे आवाहन जिवाची वाडी ग्रामस्थांनी केले आहे. जिवाची वाडी येथे होणाऱ्या रेणुका माता देवीच्या यात्रोत्सवात धार्मिक कार्यक्रमास भाविकांची नेहमी उपस्थिती असते.

**बंजरा समाज मेळाव्यात**

`ण्यात यावे व समाज तुमच्या पाठीशी आहे व राहील अशी ग्वाही या ठिकाणी मी देतो. परंतु या ठिकाणी या मेळाव्याला महत्त्वपूर्ण महाराजांची उपस्थिती असूनही दादांच्या विरोधात बंजारा समाजाने पाठ फिरवल्याने या मेळाव्यामध्ये बहुतांश खुर्च्या रिकाम्या असल्यामुळे दादांचा पराजय हा दिसून येत असल्याने प्रकाश दादा सोळंके कराय गेले एक आणि झाले एक असं या ठिकाणी दिसून येते व ज्या वेळेस महाराजांनी वसंतराव नाईक साहेब यांचे नाव माजलगाव धरणाला द्यावे असे म्हणता वेळेस दादांनी आश्वासन देण्याचं सोडून टाळ्या वाजवण्याचे काम त्या ठिकाणी केल्याने दादा या धरणाला नाव खरंच देणार का असा प्रश्न बंजारा समाजातून वर्तवण्यात येत आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# टर्की पक्षिपालन

जोडधंदा



कोंबड्यांच्या मानाने टर्की पक्ष्यांमध्ये मांसाचे प्रमाण हाडांपेक्षा तुलनेने जास्त असते, तसेच या पक्ष्यांचे मांस तुलनेने जास्त प्रथिनेयुक्त असून, त्यात स्निग्ध पदार्थांचे प्रमाण विशेषतः कोलेस्टेरॉलचे प्रमाण तुलनेने खूपच कमी असते, म्हणून टर्की पक्ष्यांच्या मांसाला लीन मीट म्हणूनही संबोधले जाते. व्यावसायिक टर्कीपालनासाठी ब्रॉड ब्रेस्टेड ब्रॉंझ, ब्रॉड ब्रेस्टेड व्हाइट आणि बेल्ट्सव्हील स्मॉल व्हाइट या जाती उपलब्ध आहेत. यांपैकी भारतातील हवामानाच्या दृष्टीने ब्रॉड ब्रेस्टेड व्हाइट आणि बेल्ट्सहील स्मॉल व्हाइट प्रजाती या जास्त उपयुक्त असल्याचे आढळून आले आहे.

एक दिवसाच्या टर्कीच्या पिल्लांची एक ते सहा आठवड्यांपर्यंत ब्रुडिंगची व्यवस्था करावी लागते. त्याकरिता गादी पद्धतीचा अवलंब करावा. कोंबड्यांप्रमाणेच गादी पद्धतीचे घर बांधून पहिल्या चार आठवड्यांपर्यंत प्रतिपक्षी दीड चौ.फू. एवढ्या जागेत दोन इंचांचे गादीमाध्यम पसरून घ्यावे. त्याच्यासभोवती एक फूट उंचीचे कुंपण तयार करावे, की ज्यामुळे छोटी पिल्ले इतस्ततः फिरणार नाहीत. पहिल्या चार आठवड्यांपर्यंत टर्कीच्या पिल्लांना कृत्रिम उष्णता देण्याची गरज असते. त्यासाठी ब्रुडर अथवा बल्ब आदीचा उपयोग करावा लागतो.

टर्की पक्षी हे आकाराने मोठे असल्यामुळे, त्यांना लागणाऱ्या जागेची गरजही कोंबड्यांच्या तुलनेने जास्त असते. खुराडे व कुंपण पद्धतीची घरे या प्रकारामध्ये मोकळया जागेभोवती कुंपण घालून पक्ष्यांना सांभाळले जाते. रात्रीच्या वेळी पक्ष्यांचे संरक्षण व्हावे म्हणून त्यांना एक छोटे घर किंवा खुराडे बांधून दिले जाते. दिवसभर पक्षी मोकळया जागेत फिरत असल्यामुळे या भागात सावलीसाठी काही झाडे लावणे फायद्याचे ठरते. रात्रीच्या निवाऱ्यासाठी आवश्यक असणाऱ्या घरांसाठी मात्र प्रत्येक

पक्ष्यासाठी तीन ते चार चौ.फू. एवढी जागा ठेवणे आवश्यक असते. या पद्धतीचा मुख्य फायदा म्हणजे घरबांधणीचा खर्च अतिशय कमी होतो. याशिवाय टर्की ज्या जागेत मोकळे फिरणार आहेत, तिथे जर लुर्सन गवतासारख्या पिकांची लागवड केली, तर हे हिरवे गवत पक्ष्यांना खाण्यासाठी वापरता येते. अशा पद्धतीने नीट वाढ झालेल्या हिरवळीवर टर्की पक्षी चक्राकार पद्धतीने वाढविल्यास पक्ष्यांच्या खाद्यावरील खर्चही जवळ जवळ निम्म्याने कमी होतो. टर्की पक्षी वयाच्या २४ ते ३० आठवड्यांमध्ये विक्रीयोग्य वजनाचे होतात. या वयात नर पक्षी साधारणतः दहा ते बारा किलो व मादी पाच ते सहा किलो वजनाचे भरतात. टर्की पक्षी हे मुख्यत्वे मांसासाठी विकले जात असल्यामुळे, त्यांनी जास्तीत जास्त वजन कमीत कमी वयात कमविणे फायद्याचे ठरते. टर्की पक्ष्यांना नाताळ, नववर्ष या ख्रिश्चन बांधवांच्या सणांना खूपच जास्त मागणी असते.

आधुनिक शेती

# फर्टिगेशन शेतकऱ्यासाठी लाभदायक

**फर्टिगेशन म्हणजे काय ?**

पिकाच्या मुळशी गरजेनुसार ठिबक सिंचनातून योग्य अन्नद्रव्य, खते व पाणी एकत्रितपणे देण्याच्या पद्धतीला फर्टिगेशन असे म्हणतात. ठिबक सिंचनात महाराष्ट्र अग्रेसर असून संपूर्ण भारताच्या ६० टक्के ठिबक सिंचन हे एकट्या महाराष्ट्रात केले जाते व यातून पिकांना खते पुरविल्यास फर्टिगेशन हे शेतीसाठी वरदान मानले जाते . ही पद्धत सर्वप्रथम १९६० मध्ये इस्राएल मध्ये सुरू झाली ज्यामध्ये हातानी टाकण्याच्या खत पद्धतीपेक्षा सिंचनातून टाकलेल्या युरिया ची पध्दत ही अधिक लाभदायक व कार्यक्षम आढळून आली होती.' आधुनिक शेती पध्दती मध्ये पाण्याची व खताची बचत करून थेंबा थेंबाने अथवा सुक्ष्म धारेने द्रवरूप/घनरूप खता मधील पोषक अन्नद्रव्ये पिकाला पुरवली जातात. विशेषतः फुलोऱ्यात, मोहोर येण्याच्या वेळी, फळ धारणाच्या वेळी, त्यानंतर फळांची वाढ होण्यासाठी अन्नद्रव्यांची अधिक मात्रा हवी असते अश्यावेळी फर्टिगेशन द्वारे दिलेली खते उपयोगी पडतात. या समस्येवर उपाय म्हणून पिकाला योग्य त्या वेळी संतुलित प्रमाणात पाण्याद्वारे विद्राव्य खते देने आवश्यक असते. ज्यामुळे अन्नद्रव्यांची पूर्तता करता येते ,पाण्याची व खताची बचत होते , पिकाला गरजे नुसार खत पाणी मिळाल्या मुळे पिकाची उगवण शक्ती पाठोपाठ पिकाचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात वाढते हे साध्य करण्यासाठी फर्टिगेशन प्रक्रिया लाभदायक ठरते.

**फर्टिगेशन चे फायदे :-**

१.फर्टिगेशन मुळे खतवापर कार्यक्षमता, पाणी वापर कार्यक्षमता व जमिनीचा सुपीकता वाढते व रोगांना बळी पडण्याचे प्रमाण थांबते.

२.फर्टिगेशन मुळे उत्पादनात २५-३० टक्के वाढ होते. द्रवरूप किंवा घनरूप खते सिंचनातून वापरल्याने ती अधिक फायदेशीर, उपयुक्त व कार्यक्षम ठरतात आणि अवक्षेपण मुक्त



असल्यामुळे ड्रीपर्स बंद होण्याची भीती नसते. ३.द्रवरूप खते सिंचनातून दिली असता तीव्र द्रावण सौम्य होते.त्यामुळे पिकांच्या मुळावर अनिष्ट परिणाम होत नाही.४.सिंचनाद्वारे खते दिल्यास पिकांना पाणी पोषण द्रव्यांचा साठा मुळां जवळ होतो व पीक वाढीस वेग येतो, तसेच पोषण द्रव्याचा ऱ्हास होत नाही.५.खते नियमित आणि कमी प्रमाणात वापरल्या मुळे जमिनीत अन्नद्रव्यांचा साठा कमी असतो आणि नियमित असतो त्यामुळे अति पावसाचे निचऱ्या द्वारे किंवा जमिनीवरून जास्तीत जास्त पाणी वाहून गेल्याने पोषक तत्व जात नाही आणि खताची एकूण २५-३० टक्के बचत होते.६.कीटकनाशके व तणनाशके द्रवरूप खतात मिसळून दिल्याने मजूर ,यंत्रसामग्री व पर्यायाने आर्थिक बचत होते. ७.हलक्या वालुकामय किंवा मुरमाड जमीनित पिकाचे उत्पादन येण्यासाठी खास व्यवस्थापणे ची गरज असते . कारण जमिनीत पाणी व खत या दोन घटकांचा सहभाग महत्त्वाचा असतो द्रवरूप खतामुळे या समस्येचे निराकरण करता येते. ८.द्रवरूप खते देण्याच्या विशिष्ट पद्धतीमुळे जमीनीचा पृष्ठभाग कठीण होत नाही क्लोराईड प्रमाण नगण्य असते पिकांवर अनिष्ट परिणाम होत नाही क्लोराईडचे प्रमाण खतामध्ये जास्त असेल तर त्या द्रावणाची क्षारता वाढते व अशी खते क्लोराईडला संवेदनशील असलेल्या पिकांना हानिकारक ठरू शकतात म्हणून क्लोराईड मुक्त खते वापरल्यास समस्या निर्माण होणार नाही.९.द्रवरूप खतांच्या रूपाने मूख्य पोषण द्रव्याचा व सूक्ष्म अन्नद्रव्यांचा समतोल पुरवठा केला जातो. १०.पिकांच्या वाढीची अवस्था व त्यांच्या गरजेनुसार द्रवरूप खतांचा वापर केला असता उत्पादनात वाढ होते.

**फर्टिगेशन करताना घ्यावयाची दक्षताः-**

१.ठिबक तोट्या/ ड्रिपर मध्ये माती किंवा पाला पाचोळा जाणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच पिकाला नळयांचा त्रास होणार नाही एवढे अंतर ठेवावे.२.ठिबक तोट्या व ड्रीपर मुख्य पाईप लाईन ला योग्यरीतीने जोडावेत. ३.ठिबक/ सूक्ष्म सिंचन संच यामध्ये खत शेवाळे, गंधक, लोह किंवा इतर क्षार साचू देऊ नये. त्यामुळे ठिबक तोट्या बंद पडतात. ४.शेवाळ असल्यास क्लोरिन प्रक्रिया व रासायनिक अशुद्धता असल्यास आ आम्लप्रक्रिया करावी.

**समाधान प्रकाश काळे** (सहा. प्राध्यापक)
(कृषी विज्ञान व कृषी रसायनशास्त्र विभाग)
कृषी महाविद्यालय, जळगाव.

वारसा


# क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे

या देशात छत्रपती शिवरायांचे स्वराज परत यावे, हा देश स्वतंत्र व्हावा, येथील रयत स्वाभिमानाने जगावी, वाढावी यासाठी देशात सशस्त्र क्रांती करून या मुलकाला परकीयांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी, ज्यांनी क्रांतिशाळा सुरू केली व अनेक महान क्रांतिकारक तयार करून या देशात क्रांतीचे वादळ सुरू केले ते लहुजी वस्ताद. त्यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदरगडाच्या पायथ्याला असलेल्या पेठ या गावी साळवे कुटुंबात झाला. हे कुटुंब दांडपट्टा, तलवार, कुऱ्हाड चालवण्यात पटाईत होते. गुप्त बातम्या काढणे व माग काढणे, शत्रूसैन्यात घुसून लढणे आदी कौशल्ये या कुटुंबाकडे होती. त्यामुळे महाराजांनी त्यांना 'राऊत' ही पदवी देऊन पुरंदरच्या रक्षणाची जबाबदारी सोपवली होती. तेव्हापासून हे कुटुंब पुरंदर किल्ल्याचे रक्षण करीत होते.

ज्यावेळी लहुजींचा जन्म झाला तेव्हा किल्ल्याची जबाबदारी त्यांचे वडील राघोजी यांच्याकडे होती, तर दुसरे बाजीराव पेशवे यांच्याकडे सत्ता होती. तसा पुरंदर किल्ल्याला मोठा इतिहास आहे. याच किल्ल्यावर छत्रपती संभाजी महाराज यांचा जन्मही झालेला असल्याने त्याचे वेगळे महत्त्व आहे. पेशवे-होळकरांमध्ये झालेल्या युध्दात हरल्यावर दुसऱ्या बाजीरावांनी इंग्रजांशी तह केला आणि होळकरांना हरवून पुणे परत घेतले. पण पेशवे नावालाच पेशवे राहिले. सर्व कारभार इंग्रज पाहू लागले. हे येथील लोकांना आवडले नाही. काही दिवसांनी दुसरे बाजीरावही वैतागले आणि लढाई करण्याचे नक्की झाले. याच काळात राघोजीने एका वाघाला जिवंत पकडून गावात आणले होते व ही खबर पेशव्यापर्यंत पोहोचली होती. म्हणून पेशव्यांनी राघोजीस पुण्याला बोलावून घेतले आणि शिकारखाना सांभाळण्याची जबाबदारी दिली.

साधारण १८१२ च्या आसपास पेशव्यांनी राघोजींना पुण्यास बोलावून घेतले आणि शिकारखान्याची जबाबदारी सोपवली. या वेळी लहुजी ऐन तारुण्यात होते आणि सर्व शस्त्रास्त्रांमध्ये तरबेज होते. शिवाय पैलवानगीमध्ये त्यांना तोड नव्हती. त्यावेळी हे कुटुंब जनाईच्या मळयात राहत होते. पेशव्यांनी इंग्राजांशी तह करून पुण्याची सत्ता इंग्राजांकडे दिली होती. पेशवे फक्त नावालाच पेशवे राहिले होते. इंग्राजांशी युध्द करून परत सत्ता मिळवण्यासाठी तयारी चालली होती. खूप मोठे सैन्य उभे केले जात होते. या सर्वांना शस्त्रास्त्रे पुरविण्याची योग्य अशी जबाबदारी पेशव्यांनी राघोजींना दिली. कारण त्यांना सर्व शस्त्रांचे उत्तम ज्ञान होते. शिवाय ते बंदूक चालवण्यातही तरबेज होते. राघोजींनी लहुजींच्या मदतीने आपल्यावरील जबाबदारी पूर्ण केली. यानंतर लढाईसाठी सैन्याची गरज होती, म्हणून राघोजींनी मांग, रामोशी व इतर मागास जातीतील हजारो सैनिक गोळा केलेहोते.

५ नोव्हेंबर १८१७ रोजी खडकीच्या



परिसरात युध्दाला सुरुवात झाली. घनघोर युध्द सुरू होते. पेशव्यांच्या सैन्याचा मारा जोराने होत होता. लढाई जिंकण्याची आशा निर्माण झाली, तेव्हाच इंग्राजांचे नव्या दमाचे सैन्य आले. लढाईच्या १२व्या दिवशी इंग्राजांबरोबर लढत असताना राघोजींना वीरमरण आले. राघोजी घोडयावरून खाली पडलेले लहुजींनी पाहिले. ते खाली पडले असताना इंग्रजांचे सैनिक त्यांना लाथाने, बंदुकीच्या दस्त्याने मारत होते. लहुजींना हे पाहवले नाही. ते त्या ठिकाणी घुसले आणि वडिलांना तेथून बाहेर काढले. तोपर्यंत खूप उशीर झाला होता. राघोजींची प्राणज्योत केव्हाच मावळली होती. काही दिवसांतच पेशव्यांचा या लढाईत पराभव झाला. शनिवारवाडयावर इंग्रजांचा युनियन जॅक फडकू लागला. भगवा उतरल्याचे दुःख लहुजींना झाले. काही दिवस ते विचार करीत होते. 'इंग्रजांना या देशातून हाकलून लावण्यासाठी परत युध्द केले पाहिजे. पण कसे ?' असा विचार करीत असताना त्यांनी शपथ घेतली की येथून पुढे जगेन तर देशासाठी आणि मरेन तर देशासाठी !

यावेळी देशात अनेक बलाढय राजे होते, सरदार होते, जवळपास ५६४ संस्थाने देशात अस्तित्वात होती. जर ही सर्व ताकद एकत्र आली असती, तर आज देशाचे भविष्य वेगळे दिसले असते. कदाचित या देशात केवळ हिंदूच दिसले असते, पण तशी स्वप्ने कोणी पाहिली की नाही हे काळालाच ठावूक. पण लहुजींनी असे स्वप्न पाहून ते प्रत्यक्षात आणण्यासाठी १८२२ला पुण्यात गंजपेठेत तालीम सुरू केली. हीच देशातील पहिली क्रांतिशाळा जिथे अनेक क्रांतिकारी घडले. या तालमीचे उदघाटन हे सरदार रास्ते यांनी केले. त्यावेळी लहुजींनी दांडपट्टयाचे अनेक खेळ करून दाखविले. त्याचबरोबर बंदुकीने नेम धरणे, तलवारबाजी असे मर्दानी खेळ दाखवून लोकांना व तरुणांना आकर्षित करून घेतले. यानंतर अनेक तरुण लहुजींच्या तालमीत दाखल झाले.

लहुजी आता वस्ताद झाले, सर्वजण त्यांना वस्ताद म्हणू लागले. तालमीत कसरत होऊ लागली. मोकळया मैदानात दांडपट्टा फिरू लागला, तर डोंगरात बंदूक धडाडू लागली. अनेक पट्टे तयार होऊ लागले. वस्ताद त्यामधील निवडक पट्टयांना वेगळे करून त्यांना मातृभूमीविषयी सांगून त्यांच्यात देशभक्ती निर्माण करू लागले. अशांचा वेगळा गट निर्माण करून त्यांनी इंग्राजांच्या विरुध्द बंडकरी तयार केले व बंडाला सुरुवात झाली. बंडकरी अनेक ठिकाणी गुप्तपणे बंड करू लागले. सुरुवातीला इंग्रजांना हे बंड वाटत नव्हते.

याच काळात उमाजी नाईक यांचेही बंड सुरू होते. उमाजी व लहुजी एकाच भागातील होते. गावाला लागून लागून त्यांची गावे होती. एकदा उमाजींनी एका दरोडयासाठी काही पट्टयांची मागणी वस्ताद यांच्याकडे केली. पण वस्ताद यांनी त्यांना नकार दिला. त्यावेळी ते म्हणाले, ''आमचे काम वेगळे आहे. तुम्ही इंग्रजांच्या विरुध्द लढाईला उभे राहा. माझ्यासहीत सर्वजण तुमच्याबरोबर असू. तुम्ही या मुलकाचे राजे व्हा.'' नाईकांनी इंग्रजांच्या विरुध्द बंड करून 'प्रतिसरकार'ची घोषणा केली. काही दिवसांत फुटीरतेमुळे नाईक पकडले गेले, तेव्हा वस्तादांनी त्यांना सोडविण्याचा प्रयत्न केला, पण यश आले नाही.

लहुजींच्या तालमीत अनेकजण येऊ लागले, तसे ज्योतिबा फुलेही आले. लहुजींच्या आखाडयात ते तयार झाले. वस्तादांचे ते आवडते होते. त्यांच्या शैक्षणिक कार्यात वस्ताद हिमालयासारखे त्यांच्या पाठीशी उभे होते. त्या काळात वस्तादांचे नाव पंचक्रोशित गाजत होते. पुण्याच्या बाहेरूनही तरुण येत होते. पुणे, नगर सातारा या भागापर्यंत त्यांचे क्रांतिकारक पसरले होते. लहुजींनी दूरदृष्टीने दलित मुलांनी शिकले पाहिजे हे ओळखून ज्योतिबांच्या मदतीने दलित मुलांसाठी गंजपेठेत १८५१ साली शाळा सुरू केली. सर्वप्रथम या शाळेत त्यांनी त्यांची पुतणी मुक्ता हिला घातले व इतर दलित मुलेही शिकू लागली.

१८५७ च्या बंडात लहुजींचे अनेक बंडकरी सामील होते, ते सर्वच्या सर्व स्वातंत्र्यासाठी शहीद झाले. सातारच्या बंडातही अनेकजण होते, तेही पकडले गेले आणि सातारच्या झेंडा मैदानावर फाशी गेले.

लोकमान्य टिळक यांनीही वस्तादांच्या तालमीत स्वातंत्र्याचे धडे घेतले. त्याचप्रमाणे वासुदेव बळवंत फडके हे तर वस्तादांचे जीव की प्राण होते. कारण मुलकाला स्वतंत्र करण्यासाठी वस्तादांना त्यांच्या रूपाने कदाचित शेवटचा आशेचा किरण दिसत होता. वासुदेवांनी जोमाने बंडाला सुरुवात केली. इंग्रजांच्या अनेक चौक्या उध्वस्त केल्या, खजिने लुटले. वस्तादांना खूप आंनद होत होता, पण वासुदेव फडक्यांनाही इंग्रजानी १८७९मध्ये पकडले आणि खटला भरला आणि त्यांना संगमाच्या जवळ असलेल्या तुरुंगात ठेवले. वस्ताद त्यांना तेथून सोडविण्यासाठी म्हणून संगमाच्या परिसरात असलेल्या महादेव मंदिराजवळ राहू लागले. यावेळी वस्तादांचे वयही झाले होते, तरी त्यांची इच्छाशक्ती प्रबळ होती. वासुदेवांचा खटला सुरू होऊन त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली व त्यांना संगमावरून हलवून एडनच्या तुरुंगात पाठविण्यात आले. ही बातमी वस्तादांना कळल्यावर त्यांना खूप वाईट वाटले. तेव्हा स्वतःच इंग्राजांवर हल्ला करण्याचा बेत आखून त्याच परिसरात ते राहू लागले.

अशा या क्रांतिगुरू वस्ताद लहुजींनी १७ फेब्रुवारी १८८१ रोजी या जगाचा निरोप घेतला.

# चारोळीला आयुर्वेदात असलेले विशेष महत्व

आयुर्वेद

आपल्या देशात सण - उत्सवाला सुरुवात झाली की घरोघरी गोडाधोडाचे पदार्थ बनवायला हमखास सुरुवात होते. या गोड पदार्थांमध्ये एक छोटीशी पण अत्यंत पौष्टिक अशी गोष्ट वापरली जाते. ती म्हणजे चारोळी. चारोळी हा सुकामेव्यातील एक पदार्थ आहे. विशेषतः गोड पदार्थांमध्ये जसे की, प्रसादाचा शिरा, दुधाची बासुंदी, दिवाळीत घरोघरी होणा-या करंजा, लाडू यांमध्ये याचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. मात्र नखभर असलेल्या या चारोळीचा वापर इथेच संपत नाही. आजच्या भागात आपण इवल्याश्या चारोळीची किमया जाणून घेणार आहोत.

चारोळी हा सुकामेवा केवळ गोड पदार्थांपुरता मर्यादीत नाही. याचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. यामध्ये अनेक आरोग्यवर्धक गुणधर्म असल्याने आपण आपल्या दररोजच्या आहारात याचा समावेश करू शकतो. यात तीस टक्के मांसवर्धक पदार्थ आणि साठ टक्के स्निग्ध पदार्थ आहे. शिवाय चारोळी हे लहान मुलांकरिता उत्तम टॉनिक असल्याचं म्हटलं जात.

**चारोळीबद्दल थोडक्यात -**

चारोळीच्या बिया या ॲनाकार्डीयास नावाच्या झाडापासून मिळतात. चारोळीचे झाड हे कोरड्या डोंगराळ भागात आढळते. विशेष करून दक्षिण भारत, ओडिसा, हिमाचल



प्रदेश, मध्य प्रदेश आणि छोटा नागपूर इत्यादी ठिकाणी ही चारोळीची झाडे आहेत. याच्या बिया म्हणजेच चारोळी.

आयुर्वेदामध्ये, खोकला, श्वासोच्छवासाच्या समस्या, डोकेदुखी, तोंडात व्रण इत्यादीसारख्या आरोग्याच्या अनेक समस्यांवर उपाय म्हणून याचा वापर केला जातो. चारोळीच्या बिया या मधुमेह आणि कोलेस्टेरॉलसाठी अतिशय गुणकारी आहेत.

**पचनास मदत करते**

चारोळी ही पचनक्रिया बरे करण्याच्या गुणधर्मांसाठी प्रसिद्ध आहे. त्यात असणाऱ्या अँटी-गॅस्ट्रिक आणि तुरट गुणधर्मांमुळे पचनक्रिया बरे होण्यास मदत होते. पोटात गॅस, गोळा येणे, पोट फुगणे आणि पोटदुखी अशा समस्यांवर चारोळी प्रभावीपणे काम करते. याशिवाय, बद्धकोष्ठता , अतिसार, अल्सर, जठराची सूज आणि पोटात जास्त प्रमाणात ॲसिड तयार होण्यावर हा एक प्रभावी उपाय आहे.

**वजन कमी करण्यास उपयुक्त**

चारोळयांमध्ये सर्वप्रकारची पोषण तत्वे आहेत. व्हिटामिन बी, व्हिटामिन सी, यांचे प्रमाण मुबलक असते. विशेष म्हणजे चारोळीमुळे वजन कमी होण्यास मदत होते. तसेच त्यात लोह, मॅग्नेशियम, फॉस्फरस, आणि कॅल्शियम ही पोषण तत्व भरपूर प्रमाणात असल्याने पदार्थातील त्याचे प्रमाण जरी कमी असले तरी त्याचा शरीराला खूप फायदा होतो.

**चारोळीचे फायदे -** शारीरिक कमजोरी दूर करण्यास चारोळी उपयुक्त आहे. तसेच शारीरिक वाढीसाठीदेखील याचा फायदा होतो. जर तुम्हाला सर्दी खोकल्याचा त्रास होत असेल तर रात्री दूधात चारोळी मिसळून प्यायल्याने याचा त्रास कमी होतो.डोकेदुखी, डोकेदुखीतून येणारी चक्कर टाळण्यासाठी चारोळीचे दाणे गुणकारी आहे. महत्वाचं म्हणजे चारोळी तुम्ही थेट खाऊ शकता. याकरिता दूध किंवा पाण्याची गरज भासत नाही. त्वचाविकारात चारोळी वाटून त्याचे उटणे केल्यास त्वचेला खूप फायदे होतात. चारोळीच्या तेलामुळे केसांची गळती तर थांबतेच पण केस काळे होण्यासही मदत होते. चारोळीचा वापर सौदर्यप्रसाधनातही करण्यात येतो. एवढ्याशा दिसणाऱ्या या चारोळीचे फायदे मात्र हजारो आहेत.

# यांत्रिकीकरणातून बटाटा, कांदा शेतीत आली सुलभता

दिशा-दर्शन

सातारा जिल्ह्यातील खटाव या दुष्काळी तालुक्यात उरमोडी धरणाचे पाणी पोहोचले आहे. त्यावर शेती बागायत करणे शेतकऱ्यांना शक्य झाले आहे. तालुक्यातील म्हासुर्णे गावातील राजाराम नाना माने व त्यांचे धाकटे बंधू सर्जेराव हे प्रगतशील शेतकरी आहेत. वडिलांकडूनचशेतीचे धडे मिळत गेल्याने दोन्ही भाऊ शेतीत रमत गेले.

राजाराम त्या काळचे मेकॅनिकल डिप्लोमाधारक आहेत. कुटुंबाची २० एकर शेती असून, पाच ते सहा एकर खंडाने केली जाते. पूर्वी पारंपरिक शेतीत मजूरटंचाई, कामांच्या वेळा, कमी उत्पादन अशा अडचणी जाणवायच्या.

पाण्याची टंचाई असल्यामुळे नवीन प्रयोग करता येत नव्हते. दरम्यान, सातारा तालुक्यातील उरमोडी धरणाचे पाणी आल्याने पाण्याची उपलब्धता होऊ लागली. त्यामुळे पीक पद्धतीची घडी बसवणे व यांत्रिकीकरण करणे शक्य झाले.

**शेतीचे केले यांत्रिकीकरण**

कांदा व बटाटा ही माने बंधूंची प्रमुख पिके आहेत. दोन्ही पिके मजूर आणि बैलांच्या साह्याने होत असल्याने अनेक अडचणी जाणवायच्या. त्यामुळे काही क्षेत्र कसण्यावाचून शिल्लक राहायचे. यावर उपाय म्हणून यांत्रिकीकरणावर भर देण्यात आला.

ट्रॅक्टर खरेदी करून गुजरात येथून बटाटा लागवडीचे (प्लँटर) व काढणीचे यंत्र खरेदी केले. त्या वेळी प्लँटर एक लाख रुपये व हार्वेस्टर (२००७ मध्ये) ७५ हजार रुपये अशी गुंतवणूक केली.

कांद्यासाठीही पेरणीचे यंत्र त्या वेळी सुमारे २२ हजार रुपयांमध्ये खरेदी केले. सर्व अवजारे, एचटीपी पंप आदींचीही टप्प्याटप्प्याने खरेदी झाली. यातून शेती सुलभ होऊन कामे वेळेत होऊ लागली. पैशांची व श्रमांचाही बचत झाली.

सुरुवातीच्या काळात चार ते पाच एकरांत होणारा बटाटा आता १५ एकर क्षेत्रावर होतो. लागवड १५ जून ते १५ जुलै दरम्यान चार फुटी गादीवाफ्यावर



(बेड) होते. लागवडीसाठी अर्थातच 'प्लँटर'चा वापर होतो.

दोन ओळींत १८ इंच, तर दोन बेण्यांमध्ये वा रोपांमध्ये आठ ते नऊ इंच अंतर असते. ठिबक सिंचन आहेच. 'प्लँटर' घेण्यापूर्वी एक एकरांत लागवडीसाठी एक दिवसासाठी दहा मजूर लागायचे. सहा ते सात हजार रुपये खर्च यायचा. यंत्राच्या वापरामुळे अडीच तासांत एक एकर क्षेत्रावर लागवड करणे शक्य झाले.

खर्चही चार हजार रुपयांपर्यंतच येऊ लागला. त्यामुळेच बटाटा क्षेत्रात वाढ करणे शक्य झाले. सर्व बटाटा शेती २००७ पासून खासगी कंपनीसाठी करार पद्धतीने केली जाते. एकरी उत्पादन खर्च ५५ ते ६० हजार रुपये येतो. एकरी सरासरी सात टन उत्पादनमिळते.

**अन्य पीक पद्धती व व्यवस्थापन**

बटाटा, कांदा यांच्या व्यतिरिक्त अन्य पिकांची विविधताही टिकवली आहे. यात सुरू उसाचे एकरी ५० ते ५५ टन उत्पादन घेण्यात येते. उन्हाळयात तसेच अन्य हंगामात दोडका, वांगी, टोमॅटो, कलिंगड, टरबूज, बीन्स, ढोबळी मिरची ही पिके दरांचा अंदाज घेऊन केली जातात.

तीन विहिरी, दोन बोअरवेल असून, उरमोडी धरणातील पाण्याचा वापर होतो. दूध व शेणखतासाठी चार म्हशी, दोन गायींचेसंगोपन केले जाते. 'प्लँटर' व 'हार्वेस्टर' अन्य शेतकऱ्यांना भाडेतत्त्वावर दिली जातात. त्यातून अतिरिक्त उत्पन्न मिळविण्यात येते.

**कुटुंब आहे एकसंध**

माने कुटुंब एकसंध असून सर्व निर्णय एकमेकांच्या विचार विनिमयातून घेण्यात येतात. कुटुंबातीलपुढील पिढीतील अवधूत, अजिंक्य, आयुष, सार्थक ही मंडळी आपापल्या परीने मदत करतात.कृषी विज्ञान केंद्र, बोरगाव येथे रोपवाटिकेचे प्रशिक्षण घेतल्याने तरुण पिढीचा हातभार चांगला लाभलाआहे. घरातील महिला सदस्यांचेही महत्त्वाचे योगदान राहिले आहे.

**कांदा व्यवस्थापन**

खरिपात तीन ते चार एकर तर रब्बीत दोन एकर कांदा असतो. यंत्राचा वापर करून पेरणी केली जाते. एकरी किमान ३० हजार रुपये खर्च येतो. खरिपात एकरी सहा ते सात टन उत्पादन मिळते. रब्बीत रोपे तयार करून लागवड केली जाते.

या हंगामात एकरी ५० ते ५५ हजार रुपये खर्च येतो. एकरी दहा टनांपर्यंत उत्पादन मिळते. या कांद्याची साठवणूक करून चांगला दर आला की मगच विक्री केली जाते. व्यापारी जागेवर येऊन खरेदी करतात. सरासरी दर प्रति किलो १० ते १५ रुपये मिळतो.

बटाटा, कांदा यांच्या व्यतिरिक्त अन्य पिकांची विविधताही टिकवली आहे. यात सुरू उसाचे एकरी ५० ते ५५ टन उत्पादन घेण्यात येते. उन्हाळयात तसेच अन्य हंगामात दोडका, वांगी, टोमॅटो, कलिंगड, टरबूज, बीन्स, ढोबळी मिरची ही पिके दरांचा अंदाज घेऊन केली जातात. तीन विहिरी, दोन बोअरवेल असून, उरमोडी धरणातील पाण्याचा वापर होतो. दूध व शेणखतासाठी चार म्हशी, दोन गायींचेसंगोपन केले जाते. 'प्लँटर' व 'हार्वेस्टर' अन्य शेतकऱ्यांना भाडेतत्त्वावर दिली जातात. त्यातून अतिरिक्त उत्पन्न मिळविण्यात येते.

माने कुटुंब एकसंध असून सर्व निर्णय एकमेकांच्या विचार विनिमयातून घेण्यात येतात. कुटुंबातीलपुढील पिढीतील अवधूत, अजिंक्य, आयुष, सार्थक ही मंडळी आपापल्या परीने मदत करतात.कृषी विज्ञान केंद्र, बोरगाव येथे रोपवाटिकेचे प्रशिक्षण घेतल्याने तरुण पिढीचा हातभार चांगला लाभलाआहे. घरातील महिला सदस्यांचेही महत्त्वाचे योगदान राहिले आहे.

**सुविचार-** कठीण परिश्रम हे यशाचे रहस्य आहे.

# गुण्यागोविंदाने नांदा....!

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत कमालीची अनिश्चतता दिसून येत आहे. बहुमत आघाडीला मिळेल की युतीला याबद्दल ठामपणे कुणीही सांगू शकत नाही, शिवाय केवळ बहुमत मिळाल्याने प्रश्न सुटणारा नाही. आघाडी आणि युतीतील प्रत्येक पक्षाला किती जागा मिळतात, त्याचवेळी छोटे पक्ष आणि अपक्षांची ताकद किती असेल यालाही खूप महत्त्व प्राप्त होताना दिसते. महाराष्ट्रात आता अशी परिस्थिती आहे की काँग्रेस आणि भाजप सोडून कोणतेही पक्ष एकत्र येऊ शकतात, त्यामुळेच निवडणुकीनंतर आकड्यांचा खेळ रंगण्याची दाट शक्यता आहे. महायुती किंवा महाआघाडीला भक्कम बहुमत मिळाले तर राज्याचे राजकारण स्थिर राहू शकते, भक्कम याचा अर्थ युती किंवा आघाडीतील कोणत्याही दोन पक्षांनी मिळून बहुमताचा आकडा गाठणे असा होतो. त्या परिस्थितीत आघाडी, युतीतील तिसऱ्या पक्षाला मुकाटपणे पदरात पडेल ते धन्य करून घ्यावे लागेल; परंतु तसे झाले नाही तर हिस्सेवाटणीचे भांडण निश्चित आहे. या भांडणांवर उपाय शोधल्या गेला तरी तो तात्पुरताच असेल, वर्ष-दोन वर्षानंतर पुन्हा फोडाफोडी, फाटाफूट होणारच नाही, याची शाश्वती नाही. ही अशी सगळी अधांतरी परिस्थिती असताना मुख्यमंत्री पदाची चर्चादेखील सुरसपणे रंगत आहे. महायुती असो अथवा महाआघाडी दोन्हीकडे मुख्यमंत्रिपदाचे दावेदार अनेक आहेत, त्यामुळे त्या मुद्यावरूनही वाद निर्माण होऊ शकतो. दोन्हीकडचे पक्षश्रेष्ठी हा वाद टाळण्यासाठी ऐनवेळी वेगळाच चेहरा मुख्यमंत्री म्हणून समोर करू शकतात. मला मिळाले नाही तरी चालेल; परंतु तुलाही मिळू देणार नाही, या स्तरावर वाद पोहचला तर दोघांनाही बाजूला सारत नव्याच चेहऱ्याचा विचार केला जाऊ शकतो. भाजपने अशा धक्कातंत्राचा बरेचदा वापर केला आहे. मोदींनी यावेळी मध्य प्रदेश आणि राजस्थानचे मुख्यमंत्री निवडताना सगळ्यांचेच अंदाज सपशेल फोल ठरविले. कदाचित ज्यांना ही मुख्यमंत्री पदाची लॉटरी लागली त्यांनाही आदल्या दिवसापर्यंत आपल्याला मुख्यमंत्रिपद मिळू शकते, असे वाटले नसेल. या पृष्ठभूमीवर राज्यात महायुतीला बहुमत मिळाले तर सत्ता आपल्याकडेच आणि स्थिर राखण्यासाठी भाजप धक्कातंत्राचा वापर करीत आपल्या मित्रपक्षांना मुख्यमंत्रिपद देऊ शकेल किंवा भाजपमधील अनपेक्षित चेहऱ्याला मुख्यमंत्री म्हणून पुढे केले जाईल. तिकडे महाविकास आघाडीत सध्या तरी मुख्यमंत्री पदासाठी काँग्रेसचा दावा मजबूत मानल्या जात आहे; परंतु ऐनवेळी काहीही होऊ शकते. या दोन्ही आघाड्यांमध्ये एकीकडे ठाकरे गट आणि दुसरीकडे अजित पवार गट कळीचे घटक ठरू शकतात. मुख्यमंत्री पदावर दावा करण्याइतपत त्यांची आमदार संख्या राहणार नाही, हे गृहीत धरले जात असले तरी मुख्यमंत्री कुणाचा होईल, कोण होईल हे ठरविण्याची चाबी त्यांच्या हाती राहू शकते. त्यामुळेच वर म्हटल्याप्रमाणे युती किंवा आघाडीला भक्कम बहुमत मिळाले नाही तर मुख्यमंत्री पदासाठी 'खो-खो'चा खेळ खेळल्या जाऊ शकतो आणि त्यात पुढच्या पाच वर्षात अनेक मुख्यमंत्री आणि त्याहीपेक्षा अनेक उपमुख्यमंत्री राज्याला लाभले तर नवल वाटू नये. भाजप आणि काँग्रेस हे दोन्ही राष्ट्रीय पक्ष राज्यात स्वबळावर सत्ता स्थापन करण्याइतपत सशक्त नाहीत. भाजपने मागच्या दोन निवडणुकांमध्ये लागोपाठ शंभरपेक्षा अधिक आमदार निवडून आणले; परंतु बहुमताच्या जादूई आकड्यापासून भाजप बरीच दूर राहिली. काँग्रेसने तर राज्यातील स्वबळाचा दावा केव्हाच सोडून दिला आहे. राष्ट्रवादीला सोबत घेऊनही बहुमताचा आकडा गाठणे शक्य नाही म्हणून या दोन्ही पक्षांनी आपल्यात तिसरा भिडू सामील करून घेतला आहे. तीन किंवा अधिक पक्षांचे मिळून तयार होणाऱ्या सरकारवर कायमच अनिश्चिततेचे सावट राहते आणि कदाचित पुढची दहा वर्षे महाराष्ट्राला याच सावटाखाली वाटचाल करावी लागू शकते. अर्थात कोणत्याही एका पक्षाच्या निरंकुश सत्तेपेक्षा असे आघाडी किंवा युतीचे सरकार सामान्य जनतेच्या दृष्टीने केव्हाही श्रेयस्कर ठरते, फक्त अपेक्षा हीच की सरकारमधील मंडळींचा सगळा वेळ आणि सगळी ताकद सत्तेच्या साठमारीतच संपू नये. मागच्या पाच वर्षात अशाच साठमारीने राज्याचे बेहाल झाले किमान पुढची पाच वर्षे तरी जे कोणते सरकार येईल ते गुण्यागोविंदाने नांदावे हीच सामान्य जनतेची अपेक्षा आहे.

# माहिमचे कवित्त्व....!

राज्यातील काही हायप्रोफाईल लढतींमध्ये मुंबईतील माहिमची लढत सामील आहे. इथून 'राज'पूत्र अमित ठाकरे पहिल्यांदाच विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. बाळासाहेब होते तोपर्यंत कोणताही 'ठाकरे' निवडणूक लढविणार नाही किंवा सत्तेच्या पदावर बसणार नाही, असा अलिखित संकेत रूढ होता; परंतु बाळासाहेबांनंतर बरेच काही बदलले आहे. मागच्या विधानसभा निवडणुकीत आदित्य ठाकरे मैदानात उतरले होते आणि त्यानंतर चालून आलेली संधी साधत उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्रिपद भूषविले. पुढे ते विधान परिषदेवर निवडून गेले. बाळासाहेबांच्याच मुशीत तयार झालेल्या राज ठाकरेंनीदेखील आतापर्यंत आपल्या कुटुंबाला निवडणुकीच्या रिंगणापासून दूर ठेवले होते; परंतु यावेळी त्यांनीदेखील आपल्या मुलाला रिंगणात उतरविले आहे. मागच्या वेळी आदित्य ठाकरेंसाठी त्या जागावरील विद्यमान आमदारासोबतच ज्याच्याकडून लढत मिळण्याची शक्यता होती त्या विरोधी नेत्यालाही 'मॅनेज' करण्यात आले. त्यामुळे आदित्य ठाकरे अगदी सहज विजयी झाले. राज ठाकरेंनी मात्र असे कोणतेच डावपेच खेळले नाही. परिणामी अमित ठाकरेंसमोर उद्धव ठाकरे गटाच्या उमेदवारासोबतच शिंदे गटाच्या उमेदवाराशी लढत देण्याची वेळ आली आहे. शिंदे गटाने आपला उमेदवार मागे घेऊन अमित ठाकरेंना पाठिंबा द्यावा यासाठी भाजपने बरेच प्रयत्न केले, कदाचित शिंदे यासाठी राजीदेखील झाले होते; परंतु सदा सरवणकर माघार घेण्यास तयार नव्हते आणि त्यामुळे शिंदेंचाही नाईलाज झाला. जे समोर दिसले ते चित्र हे असे होते, परंतु आता भाजपच्या काही नेत्यांनी शिंदे गटाचा उमेदवार रिंगणात कायम राहणे अमित ठाकरेंसाठी सोईचे आहे, असे म्हणत दुसऱ्या बाजूनेही ढोलकी वाजवायला सुरुवात केली आहे. शिंदे गटाचा उमेदवार रिंगणात नसता तर त्या ठिकाणी ठाकरे गटाच्या उमेदवाराची सहज सरशी झाली असती, असा तर्क भाजपचे एक ज्येष्ठ नेते देत आहेत; परंतु त्या ठिकाणी भाजपचा पाठिंबा बाहेरून कुणाला, आतून कुणाला किंवा आतून-बाहेरून कुणाला याबद्दलची संदिग्धता अजूनही कायम आहे. थोडक्यात माहिमचे कवित्व निवडणुकीनंतरच संपेल असे दिसते.

## लोकनामा

# न्याय व्यवस्थेतील माणसं वादाच्या भोवऱ्यात..!


**भूपेंद्र गणवीर**
9834245768
ज्येष्ठ पत्रकार, नागपूर


भारतीय न्यायव्यवस्थेला मोठा इतिहास आहे. पंतप्रधान पदावरच्या व्यक्तीची निवडणूक रद्द ठरविणारी परंपरा आहे. ती कमजोर होत आहे. तिला बळकट करावे. ही ज्यांची जबाबदारी आहे, अलीकडे तेच वादाच्या भोवऱ्यात अडकत आहेत. या अगोदरचे सरन्यायाधीश रंजन गोगोई यांच्यावर प्रचंड टीका झाली. त्यांच्या निवाड्यांकडे संशयाने बघितले गेले. त्यानंतर सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड झाले. ते नुकतेच सेवानिवृत्त झाले; मात्र महाराष्ट्रातील सत्ता संघर्षाचा वाद निकाली लागला नाही. ते मूळ महाराष्ट्रातील होते. त्यांनी या सुनावणी पासून स्वतःला दूर ठेवावयास हवे होते. ते त्यांनी केले नाही. अन् सुनावणीदेखील पूर्ण केली नाही. हा त्यांच्या कारकीर्दीवर लागलेला डाग आहे. त्यांना ऐतिहासिक निकाल देण्याची संधी होती. ती त्यांनी गमावली. सेवानिवृत्तीनंतर चंद्रचूड यांच्या कार्यकाळाचे मूल्यमापन सुरू झाले. त्यासाठी १३ मार्च-२०१६ पर्यंत जावे लागले. त्या दिवशी अलाहाबाद हायकोर्टाचा १५० वा स्थापना दिन साजरा करण्यात आला. त्या कार्यक्रमाला तत्कालिन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी मुख्य पाहुणे होते. कार्यक्रम आयोजनाचे अध्यक्ष न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड होते. या कार्यक्रमापासून मुख्यमंत्री, राज्यपाल आणि राजकारण्यांना दूर ठेवण्यात आले. तेव्हा त्यांची भूमिका होती. विधायिका, कार्यपालिका आणि न्यायपालिकांचे स्वतंत्र अस्तित्व आहे. त्यामुळे अशा कार्यक्रमांपासून राजकारण्यांना दूर ठेवले जावे. याबाबत ते आग्रही होते. त्यांची झलक त्या कार्यक्रमात दिसली.

त्यांच्या दोन महिन्यांनंतर ते सर्वोच्च न्यायालयात आले. पुढे सरन्यायाधीश बनले. तेव्हा त्यांच्याकडून बऱ्याच अपेक्षा होत्या; मात्र भ्रमनिरास झाला. उलट त्यांचा कार्यकाळ वादग्रस्त ठरला. त्यांच्या निवासस्थानी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे जाणे, एकत्र गणेश पूजेचे छायाचित्र रिलिज करणे, महाराष्ट्रातील एका कार्यक्रमात अयोध्या प्रकरणाचा निवाडा देण्यास प्रार्थनेतून मार्ग मिळाल्याचे विधान करणे, न्यायमूर्ती निवड प्रक्रिया सरकारी मर्जी सांभाळून करणे, यामुळे चांगले, निष्पक्ष न्यायाधीश सर्वोच्च न्यायालयात येण्यापासून वंचित करणे... काही प्रकरणांत त्यांना मोठ्या प्रमाणात ट्रोल करण्यात आले. ते त्यांना प्रकर्षाने जाणवले. सेवानिवृत्तीच्या भाषणात त्यांचा उल्लेख करीत ते म्हणाले, माझ्या सेवानिवृत्तीमुळे ट्रोल करणारे आता बेरोजगार होतील, तसेच न्यायमूर्तींनी ट्रिब्यूनलवर जाण्याचे समर्थन केले. ही विधाने खटकणारी ठरली. त्यांची खटला सुनावणीची थेअरी वेगळी असते अन् प्रत्यक्षात निकाल वेगळा असतो, असे मत अनेकांचे बनले आहे. कारवां मॅगझीनने त्यांच्या कार्यकाळातील वादग्रस्त प्रकरणे पुढे आणली. ती आता देशभर गाजत आहेत. हे काम तरुण पत्रकार सौरभ दास यांनी केले. चंद्रचूड यांच्या कार्यकाळावर ४४ पानी अहवाल मांडला. हा रिपोर्ट तयार करणारा पत्रकार अवघ्या २५ वर्षांचा आहे. त्याचा १६ हजार शब्दांचा हा लेखाजोखा आहे. त्याने चंद्रचूड यांच्या जन्मापासून तर सेवानिवृत्तीपर्यंतचा घटनाक्रम मांडला. त्यात शालेय मित्र, देशीविदेशी शिक्षण, वकिली, न्यायाधीश, सरन्यायाधीशपर्यंतचा प्रवास आहे. या काळातील मित्र, त्यांनी दिलेले निवाडे आदींचा परामर्श घेतला. डीवाय चंद्रचूड यांची अस्पष्टता अशा आशयाच्या इंग्रजी शीर्षकातून त्यांच्या कार्यकाळाचे वर्णन आहे. त्यात ताशेरे आहेत. आक्षेप आहेत. तसेच त्यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण निकालांची समीक्षा आहे. ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करते. चुकांवर नेमके बोट ठेवते.

हा अहवाल भावी सरन्यायाधीशांनी काय करू नये, याबाबत दिशा निर्देशन करतो, तसेच सेवानिवृत्तीनंतर सरकारी पदाच्या लालसेबाबत संशय व्यक्त करतो. न्यायदान व्यवस्था निष्पक्ष असावी. या निष्पक्षेतेला बळकटी यावी. त्यासाठी न्यायव्यवस्थेतील माणसांनी काय करावयास हवे, कोणत्या गोष्टी टाळावयास हव्या, सरन्यायाधीश कुठे, कुठे चुकले, त्यावर नेमके बोट ठेवले. या पत्रकाराची ही निर्भीडता, निडरता, हिंमत वाखाणण्यासारखी आहे. देशात असे मोजके जागले आहेत. त्या पत्रकारांच्या जोरावर लोकशाही टिकून आहे. या तरुण पत्रकाराने दोन महिने अतिशय मेहनत घेतली. संशोधन केले. त्यासाठी विधी क्षेत्रातील आजीमाजी ४० वर लोकांची मते जाणून घेतली. अन् ती बेधडकपणे मांडली. त्या पत्रकारांची मते आणि राष्ट्रीय मीडियाने रेखाटलेला धनंजय चंद्रचूड परस्पर विरोधी आहे. यात दिल्ली सरकार विरुद्ध नायब राज्यपाल प्रकरण आहे. जज लोया मृत्यू प्रकरणात चौकशीची मागणी करणारी याचिका आहे. त्या प्रकरणात चौकशीचे आदेश दिले नाही. नैसर्गिक मृत्यूचा निकाल दिला. या निकालाचे पोस्टमार्टम आहे. अयोध्या मंदिर, ज्ञान वापसी मस्जिद आहे, निवडणूक रोखे घोटाळा आहे. अशा गाजलेल्या प्रकरणांचा समाचार घेतला आहे. त्यांच्या कार्यकाळात सर्वाधिक प्रलंबित प्रकरणे निकाली निघाली. काही चांगली प्रकरणे आहेत. राजकारणाशी संबंधित प्रकरणे गाजली. त्यातील काही प्रकरणे वादग्रस्त ठरली. त्यावर लोकांचा फोकस आहे.

देशातील सर्वाधिक चर्चित महाराष्ट्रातील राजकीय प्रकरण डीवाय चंद्रचूड यांच्या पीठापुढे सुनावणीसाठी आले. या प्रकरणाची सुनावणी बघा. तत्कालिन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी स्वतःहून राजीनामा दिला. त्यामुळे पुन्हा मुख्यमंत्रिपद बहाल करता येत नाही. राज्यपालांनी घेतलेल्या निर्णयांवर ताशेरे ओढले. ते चुकले असे मत नोंदविले. परिणामी त्यांना राज्यपाल पदाचा राजीनामा देऊन परत जावे लागले. याचा अर्थ सरकार चुकीच्या मार्गाने आल्याचा अप्रत्यक्ष सूतोवाच केला. तरी त्या सरकारला आपला कार्यकाळ पूर्ण करण्यास संधी देण्यात आली. तारिख पे तारिखचा खेळ चालला. यातून लोकांनी आपआपल्या परिने निष्कर्ष काढले. आजही ते काढले जात आहेत.

महाराष्ट्रात आता निवडणुका लागल्या आहेत. तरी पक्ष फोडाफोडीचे कवित्व संपलेले नाही. बुधवारी शरद पवार यांचे नाव का वापरता..! स्वतःच्या पायावर उभे राहा. या शब्दात सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाची कानउघाडणी केली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली. हे लोकांना माहीत नाही असे आपल्याला वाटते काय..? न्यायालयाने आदेश दिला आहे. त्याचे पालन करावे.

महाराष्ट्रातील जनता हुशार आहे. त्यांना शरद पवार कोण आणि अजित पवार कोण हे माहीत आहे. शरद पवार यांच्या नावावर विसंबून राहू नका, असेही न्यायालयाने सुनावले. तसेच या अगोदर निवडणूक चिन्ह घड्याळ याबाबत न्यायालयात खटला सुरू आहे, अशा जाहिराती ३६ तासांच्या आत वृत्तपत्रातून द्या, असे आदेशही अजित पवार गटाला दिले होते. त्यानंतर आता शरद पवार यांच्या फोटोचा वापर करण्यास मनाई करण्यात आली आहे. सरकार पाडले का? पक्ष फोडलेत का? या प्रश्नाचे उत्तर होय आहे. यावर शिक्षा काय? ती गुलदस्त्यात आहे. ते पक्ष व आमदार निवडणुका लढत आहेत. जनता काहींना घरी बसवणार, काही निवडून येणार आहेत. त्यानंतर कधी तरी न्यायालयाचा निर्णय येणार. सध्या निवडणूक प्रचारात संविधान बचावचा जागर आहे. आरोप- प्रत्यारोपाचा गदारोळ सुरू आहे.

## भूमिका

# लाडक्यांच्या भावनांवर मतलबाच्या पोळ्या शेकण्याची चुरस..!


**संजय एम.देशमुख (निंबेकर)**
9881304546
(ज्येष्ठ पत्रकार, अकोला)


वर्षानुवर्षांनंतर घरी आलेल्या भावाला पाहून बहिणी म्हणतात, 'खूप दिवसांनी बहिणीचं घर दिसलं रे राज्या..!' भाऊ म्हणतो, 'हो ताई....तुझी एवढ्यात खूपच आठवण येत होती. शेवटी आपलं रक्ताचं नातं गं...कधी तुझा चेहरा पाहतो आणि कधी नाही, असं झालं, आणि मग राहवलंच नाही म्हणून सरळ निघून आलो.' मग बहीणही बिचारी भावाच्या वेड्या प्रेमात समरस होते. आनंदाने माहेरच्या सगळ्या चौकशा करता करताच लगबगीने त्याच्या पाहुणचाराची व्यवस्था करते. जेवण होते, गप्पागोष्टी होतात, आणि नंतर प्रेमळ मुखवट्यामागे दडलेला धूर्त भाऊ समोर येतो...!म्हणतो... 'ताई तुझ्याकडे भेटीसाठी यायचंच होतं, तर म्हटलं एक महत्त्वाचं काम आटोपून घेऊ. नंतर भरपूर कामांमुळे लवकर भेटीचे योग येत नाहीत गं...!'

वेडी ताई म्हणते, 'कोणतं रे काम दादा'...भाऊ म्हणतो....'काही नाही गं ते छोटसं तुझ्या सह्यांचं....आता आपलं वय वाढत चाललंय. तू तुझ्या घरी सुखी, समृद्ध आहेस. माझ्या तब्येतीमुळे पुढे माझा काही भरवसा नाही. म्हणून म्हटलं मुलांचे मार्ग मोकळे करावेत. वडिलांनी घाम गाळून मोठ्या कष्टाने जी काही शेती, घर मालमत्ता करून ठेवली, त्या हक्कनोंदींवर माझं आणि तुझंही नाव आहे. म्हटलं त्या कागदपत्रांवर माझ्या आणि मुलांची लाडकी आत्या म्हणून तुझ्याही सह्या घेऊन ते कागद त्यांच्या सूपूर्त करावेत म्हणजे आपण दोघंही जबाबदाऱ्यांमधून मोकळे.'...आत्ता कुठे बहीण भानावर आली; परंतु भावाला बोलून काय दुखवावे म्हणून सोशिक बहिणीने कोणताही गैरविचार न करता आपले उदात्त दातृत्व जागवून त्या भिकारड्या मतलबी भावाला खटाखट सह्या देऊन रवाना केले; परंतु ताकाला येऊन भांडं लपवणारा भाऊ एवढ्या वर्षांनंतर कशासाठी आला हे कळायला तिला जास्त विचार करण्याची गरज पडली नाही.

परंतु आपल्या प्रेमाचा गैरफायदा कसा घेतला जातो, धूर्त कोल्ह्यांची सौदेबाजी कशी असते, हा धडा मात्र तिला मिळाला होता. या सर्वसामान्य वास्तव घटनेतून महाराष्ट्रभरातील राजकारण्यांच्या आणि माझ्याही लाडक्या बहिणींनी स्वतःचा सद्विवेक जागृत करून काय धडा घ्यायचा तो घ्यावा. यामध्ये भिकारड्या भावापेक्षा बहीण दातृत्व, कर्तृत्व, उदारता आणि उच्च विधायक विचारांनी असामान्य ठरलेली आहे. अशी उदात्त विचारांची सुसंस्कृत महान नारीशक्ती येथील संस्कृतीत विराजमान असल्यामुळे अनाचाऱ्यांच्या विश्वासघाताच्या दुष्कृत्याचे घडे फारच धिम्या गतीने भरले जात आहेत.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांमध्ये महत्त्वाकांक्षांची ढगफुटी होऊन आश्वासनांच्या पाऊसांची मुसळधार अतिवृष्टी सुरू आहे. अतिरेकी खोटेपणा आणि निंदानालस्त्यांचे वादळी वारे जोरात वाहू लागले आहेत. मतदारांना मूर्ख बनवणाऱ्या भूलथापा आणि भावनांना हात घालणाऱ्या ढोंगी गर्जनांचे कर्कश आवाज कानांच्या पडद्यांना भेदून जात आहेत. भाजपचा धर्मांतर विरोधी कायदा, वर्षानुवर्षांपासून तीच ती दिली जाणारी रोजगारांची आश्वासने, शेतकरी कर्जमाफी, विकासकामांच्या हनुमान शेपटीप्रमाणे लांबलचक याद्यांचे आणि भरमसाठ आकडेवारीचे भूलभुलैये भाजपकडून नाचविले जात आहेत. यातून अर्थसंकल्पाचाही विचार न करण्याचा अविचारी आणि अव्यवहार्यपणा ओसंडून वाहताना दिसत आहे, तर यातील धर्म फक्त बाजूला ठेवून महिला, शेतकरी आणि सर्वसामान्यांसाठी जरा वेगळ्या पण रास्त भावातील चॉकलेटांचे वितरण महाआघाडीच्या उमेदवारांकडूनही आहे; परंतु या साऱ्या गदारोळात लाडक्या बहिणी मात्र केंद्रस्थानी आहेत. फक्त मतांसाठी सरकारी तिजोरीची उधळपट्टी करणाऱ्या....या योजनेतून लाडक्या बहिणींच्या भावनांचे गैरफायदे घेऊन ह्या निवडणुका लढविल्या जात आहेत. थापा मारण्यात तरबेज असलेल्या महायुती उमेदवारांचा बहिणींसाठी प्रेमाचा उमाळा वाढतच चालला आहे. म्हणून आता रु.१५०० ऐवजी २१०० च्या घोषणा, तर त्यावर मात म्हणून महाविकास आघाडी उमेदवार आणि नेत्यांकडून रु. ३००० करण्याची अभिवचने वचननाम्यातून समोर येत आहेत.

कोण खरे उदार, प्रेमळ भाऊ आणि कोणते खोटे भाऊ हे सिद्ध करण्याची चढाओढ लागली असून यात लाडक्या बहिणी मात्र संभ्रमित झालेल्या आहेत. विधानसभा निवडणुकांच्या राममंदिर, हनुमान चालिसा, जाती आणि धर्माचे मुर्ख बनवणारे मुद्दे वापरून वापरून गुळगुळीत झालेले आहेत. ते आता निष्प्रभ झाल्याची भिती निर्माण झाल्याने वोट बँकेवर आक्रमण करण्यासाठी महिला अत्याचाऱ्यांना कायद्याच्या पळवाटा उपलब्ध करून देणाऱ्यांना अचानक बहिणींच्या प्रेमाचे साक्षात्कार झालेले आहेत. त्यासाठी मोदी आणि योगी हे दोन कलियुगातले भगवान सुद्धा महाराष्ट्र पालथा घालत आहेत. आता त्यांच्यामुळे पनवती लागते की, सत्यवानांची भत्त्याची व्यवस्था करणारी सत्तासुंदरी हातात लागते ते पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. त्यासाठी महायुतीच्या उमेदवार आणि नेत्यांनी आपल्या जावयांना अंकित करून ठेवणाऱ्या बहिणींनाच सत्तेच्या मतलबासाठी हाका दिलेल्या आहेत. म्हणूनच लाडक्या बहिणींच्या घरांचे विस्मृतीत गेलेले मार्ग त्यांनी अनेक वर्षांनंतर शोधून काढलेले आहेत.

या प्रचाराच्या गजबजाटात इतरांना विरोधकांसाठी आचारसंहितेचे बडगे उगारणारा निवडणूक आयोग कुणाच्या इशाऱ्यांवर काम करतो हे आता सर्वसामान्य मतदारांनाही समजायला लागलेले आहे. त्यामुळे निःपक्षपात गुंडाळून ठेवून सोईनुसार डोळ्यांची उघडझाप करून कानांचे चलनवलनही तसेच ठेवले जात आहे. एवढ्या प्रचंड प्रमाणात आमिषांची चॉकलेटे वाटणाऱ्या राजकीय पक्षांना आचारसंहितेच्या नियमांनी नियंत्रित करणे हे निवडणूक आयोगाचे कर्तव्य नाही काय? परंतु संविधान आणि कायदे तथा आचारसंहितांचे डांगोरे पिटणारा हा देश आणि आमचा महाराष्ट्र कोणत्या दिशेला चालला यावर नुसते विचार करून स्वस्थ बसणे आहे. कारण सत्ताधारीच जर विपरीत आणि मनमानी पद्धतीने वागत आहेत, तर निवडणूक आयोगही हतबल आहे. कारवाई करणार कुणावर? सत्ताधाऱ्यांच्या तुलनेत विरोधकांचे प्रमाद कमीच आहेत. बिघडलेल्या राजकारण्यांना पिढीजात सत्तेत राहण्याच्या महत्त्वाकांक्षा आणि त्यांच्या सोई-सुविधांचे चोचले सांविधानिक बदल करून नियंत्रित झाले पाहिजेत. अमेरिकेप्रमाणेच निवडणुकांमध्ये भाग घेण्याच्या मर्यादाही ठरवून दिल्या पाहिजेत. परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे तो सर्वांनी पाळलाच पाहिजे. नाही तर विनाश हा दूर नसतो हे सत्य राजकीय नेत्यांनी ओळखले पाहिजे...! स्वायत्त संस्थांनीही याचे भान ठेवले पाहिजे....!

## वास्तव

# लोकशाही बळकट करण्यासाठी त्याची सुरुवात कुटुंबापासून करायला हवी!


**डॉ. सुभाष के. देसाई**
9423039929


मी मानसशास्त्राचा पदवीधर आहे. मला असे वाटते, की जर तुम्हाला लोकशाही मजबूत आणि निरोगी बनवायची असेल, तर तुम्ही स्वतःच्या कुटुंबापासून याची सुरुवात केली पाहिजे. तुम्ही जेव्हा तुमच्या पत्नी किंवा मुलांना काहीही हुकूम देता याचा अर्थ तुम्ही हुकूमशहा आहात. हिटलरला देशातून काढून टाकण्यासाठी हिटलरला तुमच्या कुटुंबातून काढून टाकणे आवश्यक आहे. हुकूमशाहीचा स्वभाव बदलायला हवा. त्याचा सविस्तर विचार करा.

कौटुंबिक नातेसंबंधांना लोकशाही मूल्यांच्या संवर्धनासाठी बदलणे महत्त्वाचे आहे. कुटुंबामध्ये समतावादाला चालना देण्यासाठी मी काही विचार सुचवतो, तुम्ही त्यावर विचार करा.

कुटुंबामध्ये सुसंवाद निर्माण व्हायला हवाः खुल्या संवादाला प्रोत्साहन द्या. प्रत्येकाचा दृष्टीकोन ऐका.

आदरपूर्ण मतभेदः मतभेद, वादविवाद आणि रचनात्मक टीका करण्यास परवानगी द्या. रचनात्मक संवाद वाढवा.

एकमत निर्माणः निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत कुटुंबातील सदस्यांचा समावेश करा. घरगुती जबाबदाऱ्या आणि निर्णय घेणे सामायिक करा. आव्हानांना एकत्रितपणे संबोधित करा.

स्वायत्तताः मुलांना आणि पत्नीला निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य द्या. आणि प्रश्न विचारण्यास प्रोत्साहन द्या. विविध रूची आणि मतांचा आदर करा.

लोकशाही मूल्यांचे जतन करा. आदर, सहानुभूती आणि समानता प्रदर्शित करा. चुका मान्य करा. जबाबदारी घेण्याची आणि शिकण्याची इच्छा दाखवा. कुटुंबातील सदस्यांना समान वागणूक द्या.

संघर्षाचे निराकरणः संघर्ष निराकरणाला प्रोत्साहन द्या.

तडजोडः परस्पर स्वीकार्य उपाय शोधा.

माफी मागा आणि क्षमा करा. भावनिक बुद्धिमत्तेचा प्रचार करा. लोकशाही तत्त्वांची चर्चा करा. समानता, न्याय आणि स्वातंत्र्य स्पष्ट करा. ऐतिहासिक उदाहरणे शेअर करा. लोकशाही, संघर्ष आणि यशाचे वर्णन करा. स्थानिक सामुदायिक उपक्रमांमध्ये सहभागी व्हा. भावना ओळखा आणि त्यांचा आदर करा. समजूतदारपणा आणि सहानुभूतीला प्रोत्साहन द्या. स्वयं- नियमन कौशल्ये विकसित करा. हुकूमशाही प्रवृत्तीवर मात करा. आत्म-चिंतन करा. हुकूमशाही वर्तन ओळखा. प्रतिक्रिया शोधा. कुटुंबातील सदस्यांना रचनात्मक टीका करण्यास सांगा. समुपदेशकांचा सल्ला घ्या. स्थानिक समुदाय सेवेत व्यस्त राहा.

लोकतांत्रिक प्रक्रियेत सहभागी व्हा.



मतदान करा.

सामुदायिक बैठकीत उपस्थित राहा. लोकशाही संस्थांना पाठिंबा द्या.

ही पुस्तके वाचाः जॉन ब्रॅडशॉ यांचे 'द फॅमिली', शेरॉन लेबेलचे 'डेमोक्रसी इन द फॅमिली'.

या धोरणांची अंमलबजावणी करून, कुटुंबे लोकशाही मूल्ये जोपासू शकतात. निरोगी नातेसंबंधांना प्रोत्साहन देऊ शकतात आणि मजबूत, अधिक न्याय्य समाजासाठी योगदान देऊ शकतात.

## वाचक विचार मंच

### रस्ते अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या वाढत आहे!

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या अहवालानुसार देशात गेल्या १० वर्षांत, २०१४-२०२३ या कालावधीत १५ लाख ३० हजार लोकांनी रस्ते अपघातात आपले प्राण गमावल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. रस्ते अपघातांच्या बाबतीत उत्तर प्रदेश राज्य देशात पहिल्या क्रमांकावर असून त्यानंतर तामिळनाडू, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, कर्नाटक व राजस्थान या राज्यांचा नंबर लागतो. या आधीच्या दशकात म्हणजे २००४-२०१३ या काळात देशात रस्ते अपघातात १२ लाख १० हजार मृत्यूची नोंद झाली होती. या अहवालात नमूद केल्याप्रमाणे भारतात दर १० हजार किलोमीटरवर रस्ते अपघातात जीव गमावणाऱ्यांची संख्या २५० असून इतर देशांच्या म्हणजे चीन (११९), अमेरिका (५७) आणि ऑस्ट्रेलियाच्या (११) तुलनेत खूप जास्त आहे. दुसरीकडे अहवालानुसार २०१२ मध्ये एकूण नोंदणीकृत वाहनांची संख्या १५.९ कोटी होती. ती दुपटीने वाढून २०२४ मध्ये ३८.३ लाख पर्यंत पोहोचली; मात्र या कालावधीत रस्त्यांचे प्रमाण वाढले नाही. २०१२ मध्ये भारतात ४८.६ लाख किलोमीटर लांबीचे रस्ते होते. ते २०१९ पर्यंत वाढून केवळ ६३.३ लाख किलोमीटरपर्यंत पोहोचले. देशात रस्ते सुरक्षेच्या सर्व उपाययोजना करून, तसेच सामाजिक प्रबोधन करूनही वाहनचालकांकडून सातत्याने वाहतूक नियमांचे उल्लंघन होत असल्याने रस्ते अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या वाढत आहे, ही चिंताजनक बाब आहे.

**प्रदीप शंकर मोरे**
मुंबई, मो. नं.: ९८७०७७७२७४

### ...तर वाचनसंस्कृती टिकून राहील!

मराठी पुस्तके, वृत्तपत्रे, दिवाळी अंक या गोष्टी महाग नाहीत. चंगळवादी वस्तूंवर शेकडो, हजारो रुपये खर्च करणारे लोक यावर मात्र खर्च करीत नाहीत. घरात मराठी वृत्तपत्रे, पुस्तके असतील तर नवीन पिढीला वाचनाची सवय लागेल आणि वाचनसंस्कृती टिकून राहील याची जाणीव असावी. वृत्तपत्रे, पुस्तके प्रकाशित करणे सोपे राहिलेले नाही. वाचकांचा प्रतिसाद आवश्यक आहे.

**प्र. मु. काळे**,सातपूर, नाशिक.
मो. नं.: ९२७३०४५७९४

## धुमस

### तडीपार

'विश्वगुरूं'ना म्हणाले असतील
भक्तांसंगे नवे शिष्य
मातोश्री अन् काकांविरुद्ध
करू नका काही भाष्य

तुमच्या अशा वक्तव्यांनी मतदार
करतील आपला खात्मा
सत्तेपासून 'तडीपार' होऊ
'भटकत' राहील आपला 'आत्मा'

'भ्रष्टाचाऱ्यां'ना मांडीवर बसवले
आठवण देतोय पुन्हा पुन्हा
टिकेमुळे गमवाल परगणा
आपणच झालो त्यांचे 'सरगणा'

**ॲड. अनंत खेळकर**
अकोला

## संवाद

# खाण्यापिण्यातील बदलांमुळे आरोग्यावर ताण!

जगभरातील लोकांच्या खाण्याच्या आवडीनिवडी बदलल्या जात आहेत. घरी बनविलेल्या भोजनाचा आस्वाद घेण्याऐवजी घराबाहेर बनविले जाणारे पदार्थ हे निव्वळ जिभेचे चोचले पुरविण्यासाठी खाल्ले जातात. फास्ट फूड, प्रोसेस्ड फूड यांचा स्वीकार केला जातो; परंतु त्यामुळे पचनक्रियेवर ताण पडतो याकडे दुर्लक्ष केले जाते. म्हणजेच आवश्यकता नसलेल्या पदार्थांचे सेवन केले जाते जे शारीरिक व्याधींना आयतेच निमंत्रण देते. अशा पदार्थांमुळे हृदयरोग, मधुमेह असे असांसर्गिक आजार संपूर्ण जगभर वाढत आहेत. चुकीच्या प्रमाणात आणि मिश्रणात बनविलेले पदार्थ सेवन केल्याने होणाऱ्या आजारांवर उपचार म्हणून औषधोपचार केले जातात; परंतु आपल्या भोजनाच्या चवीवर नियंत्रण ठेवून आजारांना दूर ठेवण्याचे प्रयत्न केले जात नाहीत. अशाप्रकारचे रेडिमेड पदार्थ सेवन केल्याने लोकांच्या आरोग्यावर घातक



परिणाम होत आहेत.

जागतिक अन्न संघटनेने जगभरातील १५७ देशांच्या प्रणालीमुळे होणाऱ्या अन्नव्यवस्थेच्या नुकसानीचे मूल्यांकन केले असता त्याचे अंदाजे मूल्य १२ लाख कोटी डॉलर्स एवढे झाले. अन्न शिजविण्याची प्रक्रिया, वितरण आणि उपभोग यांत होणाऱ्या फरकांमुळे जे काही असंसर्गजन्य आजार होतात त्याने भारतात सुमारे ७९ लाख कोटी रुपयांचे नुकसान होत आहे. लोकांकडून नैसर्गिक अन्न घटक, फळफळावळ, वनस्पतिजन्य पदार्थ, धान्य यांच्या सेवनात घट झाल्यामुळे जशी सामाजिक हानी होते तशीच पर्यावरणाचीदेखिल हानी होत असते. कुपोषण आणि शारीरिक थकवा, शरीराची प्रतिकारशक्ती ढासळणे अशा तक्रारी उद्भवतात.

लोकांनी बदललेल्या खानपान प्रकारांमुळे लोकांना आरोग्यासाठी मोठी किंमत मोजावी लागणार आहे, हे लक्षात घेऊन फास्ट फूड, प्रोसेस्ड फूड, जंक फूड यांना सारून घरच्या जेवणाचा शक्यतो आस्वाद घ्यावा व आरोग्य अबाधित राखावे.

राजन पांजरी
मुंबई
मो. नं.: ९८१९७००८१८

## गुल्लेर

# घरातच फूटफाट


**नरेंद्र इंगळे**
9561226572


'पाह्यजो.. आपल्या मानसाले मत देजो.'

'आपल्या म्हणजे कोनत्या?'

'पंजाले मत देजो.. आपला सोयरा उभा आहे.'

'मी नाई देत पंजाले.. त्यानं काय देलं? मी धनुष्यालेच देईन. एकनाथभाऊनं दीळ हजार रुपये मयना सुरू केला.'

'अवं सोयरे काय म्हनतीन? जिकडे समाज चालला तिकडे जा लागते आपल्याले.'

'सगळ्या बाया धनुष्याले मत देऊन राह्यल्या.. तुमचा सोयरा तुमीच डोकशावर घेऊन नाचा.'

'कशी भयानी आहेस व? मी आठ दिवसापासून सोयऱ्याचा प्रचार करुन राह्यलो.. सकाळून गेलो की संध्याकाईच घरी येतो. लोकं म्हनतीन, तुमच्या घरातच बंडखोरी झाली.. एक बायको तुमच्या म्हटल्यानं आयकत नाही.. मंग काय फायदा?'

'मले सांगा.. बायाईले पगार कोनं चालू केला? इतके वर्षे झोपले होते काय तुमचे कांग्रेसवाले?'

'राहुल गांधी म्हनतात आम्ही निवडून आल्यावर तीन हजार रुपये मयना देऊ.'

'मंग आतालोक काहून देला नाही?'

'आतालोक सरकारच नव्हतं.'

'काय बोलून राह्यले? मोदीच्या आगुदर मोहन आबा पंतप्रधान नव्हता काय? त्याटाईमले काहून पगार देला नाही?'

'त्याटाईमले सरकारच्या लक्षात आलं नाही.. एवढी महागाई नव्हती.. चारशाले सिलेंडर भेटे. आता किती महाग झालं?'

'ते काही असो.. म्या एकनाथ भाऊले शब्द देला हाय.'

'एकनाथ भाऊ भेटले काय तुले?'

'माह्या सपनात आले होते.. म्या म्हटलं भाऊ मी तुमाले सोडून कुठीच जात नाही. माह्या नवऱ्यानं कितीही दांडू आपटला तरी कोनाची सुनत नाही.'

'याचा अर्थ तुले सोयऱ्याची किंमत नाही. लोकं जातीसोबत माती खातात.. तू एकच धरुन बसली.'

'खानाराले माती खाऊ द्या.. मी मातीखावरी नाही. आपल्या गावातल्या तिनशे बायाईनं संकल्प केला की, धनुष्यालेच मत देऊ.'

'माहा नाक गमाऊ नको.'

'तुम्ही माह्यामागं टुमनं लाऊ नका.. नाहीतर मी वंचीतले मत देईन.

# दुसऱ्याचे गाणे वाजवणाऱ्यांवर गुन्हा दाखल

## लोहा मतदारसंघात नामसाधर्म्याचा दुरुपयोग

देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** विधानसभा निवडणुकीमध्ये लोहा मतदारसंघात एका उमेदवाराने दुसऱ्या उमेदवाराचे गाणे वापरल्यासंदर्भात लोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रचार साहित्यासाठी माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समितीची (एमसीएमसी) परवानगी आवश्यक आहे. मात्र, ही परवानगी तर घेतलीच नाही उलट नामसाधर्म्य असलेल्या उमेदवारांचे गाणे वापरले तसेच प्रचारात लोकांची दिशाभूल केली. त्यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लोहा मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षाच्या आशाबाई श्यामसुंदर शिंदे निवडणूक रिंगणात आहेत. त्यांच्याच नावाशी साधर्म्य असणाऱ्या अन्य अपक्ष महिला उमेदवार आशाताई श्यामसुंदर शिंदे यांनी शेकापच्या आशाबाई यांच्या प्रचार गीताची कॉपी केली असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

# जम्मू-काश्मीर आणि हिमाचलमध्ये बर्फवृष्टी

## हंगामातील पहिली बर्फवृष्टी

वृत्तसंस्था...



**जम्मू :** उत्तर भारतात हिमवर्षाव सुरू झाला असून, मैदानी भागात धुक्यासोबतच दिवस आणि रात्रीच्या तापमानातही झपाट्याने चढ-उतार होत आहेत. त्याचवेळी मान्सून परतल्याने दक्षिण भारतात पाऊस पडत आहे. जम्मू-काश्मीर आणि हिमाचलमध्ये बर्फवृष्टी सुरू झाली आहे. साधना टॉप, गुरेझ, पीर पंजाल रेंज, पीर की गली, काश्मीर खोऱ्यातील कुपवाडामधील सोनमर्ग आणि लडाखच्या झोजिला पासमध्येही हंगामातील पहिली बर्फवृष्टी झाली. त्याच वेळी दिल्ली, पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशचे मैदानी भाग प्रदूषण आणि धुक्याशी झुंजत आहेत. या राज्यांतील अनेक जिल्ह्यांमध्यें ३५० ते ४०० दरम्यान नोंदवले गेले. ११ नोव्हेंबर रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने असेही म्हटले होते

# एटीएस करणार नेपाळ सीमेची निगराणी

## ५ जिल्ह्यांवर ठेवणार विशेष लक्ष

वृत्तसंस्था



**लखनऊ :** उत्तर प्रदेशच्या ५ संवेदनशील जिल्ह्यांमध्ये दहशतवादविरोधी पथक (एटीएस) स्थापन करण्याची तयारी सुरूआहे. राज्य सरकारने परवानगी दिली आहे. राज्यातील पिलीभीत, मिर्झापूर, खेरी, सिद्धार्थनगर आणि मुरादाबादमध्ये ही युनिट्स स्थापन केली जाणार आहेत. हे पाचही जिल्हे अतिशय संवेदनशील आहेत.

राज्य सरकारने २ वर्षांपूर्वी १२ जिल्ह्यांमध्ये एटीएस कमांडो केंद्रे निर्माण करण्याची घोषणा केली होती, त्याची प्रक्रिया सुरू आहे. श्रावस्ती, बहराइच, मेरठ, अलीगढ, ग्रेटर नोएडा (जेवार विमानतळ), आझमगड (विमानतळाच्या जवळ), कानपूर, मिर्झापूर, सोनभद्र आणि देवबंद येथे एटीएस कमांडो प्रशिक्षण केंद्रे स्थापन केली जात आहेत. याशिवाय वाराणसी आणि झाशी येथे एटीएसच्या तुकड्या स्थापन करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# राजस्थानच्या टोंक जिल्ह्यात हिंसाचार; ६० जणांना अटक

## समर्थकांनी अनेक वाहने जाळली

वृत्तसंस्था

**टोंक:** राजस्थानमधील टोंक जिल्ह्यातील देवली उनियारा विधानसभा मतदारसंघात बुधवारी प्रचंड हिंसाचार झाला. या परिसरात झालेल्या पोटनिवडणुकीदरम्यान अपक्ष म्हणून निवडणूक लढविणाऱ्या नरेश मीणा यांनी निवडणूक ड्युटीवर तैनात असलेल्या एसडीएम अमित चौधरी यांना चोप दिला. यानंतर पोलीस नरेश मीणाला अटक करण्यासाठी गेले असता सामरावता गावातील लोकांनी पोलिसांवर हल्ला केला आणि हिंसाचार केला. नरेश मीणा यांच्या समर्थकांनी अनेक वाहनेही जाळली. याप्रकरणी आता पोलीस कडक कारवाई करत आहेत. टोंक जिल्ह्यातील देवली उनियारा विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी अपक्ष उमेदवार नरेश मीणा यांना पोलिसांनी पकडण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, याच काळात सामरावता गावात गोंधळ, दगडफेक आणि जाळपोळ झाल्याची घटना घडली. या प्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत ६० जणांना अटक केल्याचे अजमेर रेंजचे आयजी ओम प्रकाश यांनी सांगितले.

# सौदीच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पावरून वाद; ब्रिटनच्या प्रसारमाध्यमाकडून आरोप

वृत्तसंस्था

**जेद्दा :** सौदी अरेबिया सरकारने एनईओएम प्रकल्पाचे सीईओ नदमी अल नस्र यांना पदावरून हटविले आहे. नदमी यांच्या जागी आता ऐमान अल-मुदाइफर यांना कार्यकारी सीईओ म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे. एनईओएम हा निर्जन वाळवंटात एक नवे शहर वसविण्याचा प्रकल्प आहे. तर दुसरीकडे ब्रिटनच्या प्रसारमाध्यमाने या प्रकल्पाच्या उभारणीदरम्यान २१ हजार मजुरांचा मृत्यू झाल्याचा दावा केल्याने खळबळ उडाली आहे.

एनईओएम प्रकल्पाच्या यशावरून संशय वाढू लागला आहे. सरकार हा प्रकल्प मुदतीत पूर्ण न झाल्याने आणि वाढत्या खर्चामुळे निराश असल्याचे समजते. एनईओएम हा सौदीचे युवराज मोहम्मद बिन सलमान यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. या प्रकल्पाकरता सौदीने ४० लाख कोटी रुपये खर्च करण्याची तयारी केली आहे. हा प्रकल्प सौदी व्हिजन २०३० चा हिस्सा आहे. याच्या माध्यमातून सौदी अरेबिया कच्च्या तेलावरील स्वतःची निर्भरता कमी करू इच्छित आहे. एनईओएम प्रकल्पातील द लाइन हे शहर वसविण्यादरम्यान मागील ८ वर्षांमध्ये आतापर्यंत २१ हजार मजुरांचा मृत्यू झाला आहे.

या मजुरांमध्ये बहुतांश करून भारत, पाकिस्तान आणि नेपाळचे लोक सामील होते असा दावा ब्रिटिश वृत्तवाहिनी आयटीव्हीने केला आहे.

# दिल्लीत पारा घसरला; धुक्यामुळे सात विमाने अन्यत्र वळवली

वृत्तसंस्था...



**नवी दिल्ली :** राजधानी दिल्ली आणि आसपासच्या भागावर उत्तर भारतात आज दाट धुक्याची चादर दिसून आल्याने पारा घसरला. दिल्लीत आधीच धुरक्याचे प्रदूषण असताना या हंगामातील पहिल्या दाट धुक्यामुळे दृश्यमानता अधिक घटल्याने दिल्ली तसेच उत्तर भारतात रस्तेमार्ग आणि हवाई वाहतुकीवर परिणाम झाला. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार दिल्ली राजधानी क्षेत्र त्याचप्रमाणे उत्तर भारतातील काही शहरांमध्ये धुक्यामुळे दृश्यमानता घटल्याचे दिसून आले. धुके आणि प्रदूषणामुळे दिल्लीत दृश्यमानता १०० मीटरपर्यंत कमी झाली.

दिल्लीच्या पालम विमानतळावरील दृश्यमानता सोमवारी संध्याकाळी सातच्या दरम्यान, ९०० मीटर होती ती रात्री साडेअकराच्या सुमारास ३०० मीटरपर्यंत कमी झाली. तर बुधवारी सकाळी दृश्यमानता १०० मीटरपेक्षाही कमी होती. इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात त्याचप्रमाणे, दक्षिण दिल्ली, नेहरुप्लेस, गुरुग्राम व ग्रेटर नोएडा भागातही दाट धुके दिसले. साहजिकच या धुक्यामुळे विमानांच्या उड्डाणांवर व उतरण्यावर परिणाम झाला.




## जी-२० च्या ब्राझील घोषणापत्रावर एकमत होण्यास भारत करणार मदत

# जी-२० थीम भारताच्या नेतृत्वाखाली

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली:** ब्राझीलमध्ये पुढील आठवड्यात होणाऱ्या जी -२० शिखर परिषदेनंतर जारी करण्यात येणाऱ्या घोषणापत्रात नवी दिल्लीच्या घोषणेसाठी गेल्या वर्षी सारखीच कोंडी होण्याची अपेक्षा आहे. त्यावेळी ब्राझील, दक्षिण आफ्रिका आणि इंडोनेशिया या देशांनी भारताला सहमती निर्माण करण्यासाठी मदत केली होती. परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी जी -२० शिखर परिषदेबद्दल सांगितले की, 'ब्राझीलने यावेळी ठरवलेल्या शिखर परिषदेची थीम भारताच्या नेतृत्वाखाली गेल्या वर्षी झालेल्या शिखर परिषदेची भावना पुढे नेणारी आहे. उदाहरणार्थ, या वर्षीची थीम भूक आणि गरिबी विरुद्ध जागतिक एकता अशी आहे, शाश्वत विकास आणि ऊर्जा संक्रमण आणि जागतिक संस्थांमधील सुधारणा आहे. यावेळी, भारत गरीब देशांवरील कर्जाचा बोजा कमी करणे आणि पारंपरिक ऊर्जा स्त्रोतांच्या जागी पर्यावरणास अनुकूल ऊर्जा स्त्रोतांना प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक निधी उभारणे यासारख्या मुद्यांवर चालू असलेली गतिरोध संपवण्यासाठी आपला प्रभाव वापरण्याचा प्रयत्न करेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एक उच्चस्तरीय भारतीय संघ या शिखर परिषदेत सहभागी होणार आहे.

## पंतप्रधान मोदी तीन देशांच्या दौऱ्यावर

पंतप्रधान मोदी १६ नोव्हेंबरपासून तीन देशांच्या दौऱ्यावर जात आहेत. ते प्रथम नायजेरियाला भेट देतील (१६-१७ नोव्हेंबर). त्यानंतर १८-१९ नोव्हेंबरला ते ब्राझील आणि त्यानंतर गयानाला भेट देतील. परराष्ट्र मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, १७ वर्षांनंतर भारतीय पंतप्रधानांची ही नायजेरियाला भेट असेल, तर ५६ वर्षांनंतर कॅरेबियन देश गयानाला भेट देणारे ते पहिले पंतप्रधान असतील. याआधी १९६८ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी तेथे गेल्या होत्या. परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव (पूर्व) जयदीप मजुमदार म्हणाले की, गयानासोबत भारताचे आर्थिक संबंध अधिक दृढ करण्याची भरपूर क्षमता आहे. गयानामध्ये पीएम मोदी, भारत आणि कॅरिकॉम ऑर्गनायझेशन (कॅरिबियन कम्युनिटी अँड कॉमन मार्केट) यांचीही बैठक होणार आहे. CARICOM सोबत भारताची ही दुसरी बैठक असेल.

# अ‍ॅट्रासिटी घटनेतील ९९ दोषींना जामीन; धारवाड खंडपीठाने दिला निकाल

वृत्तसंस्था




**धारवाड :** कर्नाटकातील धारवाड इथे दलित वस्तीतील घरे पेटवून दिल्याच्या घटनेतील ९९ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा झाली होती. या सर्व आरोपींना कर्नाटक हायकोर्टाने जामीन मंजूर केला आहे. त्यामुळे या आरोपींची आता तुरुंगातून सुटका होणार आहे. हायकोर्टाच्या धारवाड खंडपीठाने हा निकाल दिला.

२८ ऑगस्ट २०१४ रोजी हे दलित अत्याचाराचे प्रकरण घडले होते. या प्रकरणातील मंजुनाथ हा मुख्य आरोपी असून तो आपल्या मित्रांसोबत गंगावटी शहरात सिनेमा पाहायला गेला होता. यावेळी सिनेमा हॉलमध्ये त्याच्या गटाचे दुसऱ्या एका तरुणांच्या गटासोबत भांडण झाले. यानंतर मंजुनाथ याने आपल्या सवर्ण जातीतील लोकांना भडकावले आणि भांडण झालेल्या तरुणांना धडा शिकवण्याच्या हेतूने माराकुंबी गावातील त्यांच्या दलित वस्तीवर हल्ला चढवला. यामध्ये वीटा आणि दगडफेक करण्यात आली. त्यानंतर बदला घेण्याच्या उद्देशाने त्यांनी तिथल्या अनेक झोपड्या पेटवून दिल्या.

# सुप्रीम कोर्टाबाहेरील स्फोटात हल्लेखोर ठार

वृत्तसंस्था

## हल्ल्याने ब्राझील हादरले!



**ब्राझील :** जी-२० परिषदेची तयारी अंतिम टप्प्यात असताना बुधवारी (दि.१३) आत्मघाती हल्ल्याने ब्राझील हादरले. सर्वोच्च न्यायालयाबाहेर झालेल्या स्फोटात हल्लेखोर ठार झाला आहे. ब्राझीलमध्ये होणाऱ्या जी-२० परिषदेमध्ये जगातील २० मुख्य अर्थव्यवस्था असणाऱ्या देशांचे नेते सहभागी होणार आहेत. चीनचे राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपिंग लवकरच ब्राझीलला भेट देणार असून, यापूर्वी झालेल्या हल्ल्याने देशभरात खळबळ माजली आहे.

ब्राझील सर्वोच्च न्यायालयाच्या इमारतीजवळ पार्किंगमध्ये आत्मघाती हल्ला झाला. त्यानंतर काही सेकंदांनी सर्वोच्च न्यायालयासमोर दुसरा स्फोट झाला.

ब्राझीलच्या मध्यवर्ती सरकारच्या मुख्य इमारतींना जोडणाऱ्या चौकातील प्लाझा ऑफ थ्री पॉवर्सजवळ हे स्फोट झाले. हल्लेखारांना सुप्रीम कोर्टाची इमारतीला लक्ष्य करायचे असल्याचा अंदाज प्राथमिक तपासात व्यक्त केला जात आहे. पोलिसांनी स्फोटक शोधक रोबोटसह बॉम्ब पथक तैनात केले आहे. आत्मघाती बॉम्बस्फोट घडवून आणण्यात आला तेव्हा सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश न्यायालयाच्या आवारातच होते. त्यांना तात्काळ सुरक्षितस्थळी हलवण्यात आले, असे न्यायालयाच्या प्रशासनाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे. फेडरल डिस्ट्रिक्टच्या व्हाईस गव्हर्नर सेलिना लिओ यांनी सांगितले की, प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे, की सर्वोच्च न्यायालयात प्रवेश करण्याचा प्रयत्न करताना त्या व्यक्तीने स्फोटकांचा स्फोट केला. तो कारमधून आला होता. या कारमध्येच दुसरा स्फोट झाला. मृताची ओळख अद्याप पटलेली नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## पंतप्रधान मोदींना डॉमिनिकाचा सर्वोच्च पुरस्कार

**नवी दिल्ली :** उत्तर अमेरिका खंडातील डॉमिनिकाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सर्वोच्च पुरस्काराची घोषणा केली. डॉमिनिकातील सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार, 'डॉमिनिका अवॉर्ड ऑफ ऑनर'ने नरेंद्र मोदी यांचा सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती पंतप्रधान कार्यालयाने गुरुवारी दिली आहे. नरेंद्र मोदी यांच्या आफ्रिका दौऱ्यापूर्वी या पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे. कोरोना महामारीच्या काळात डॉमिनिकामध्ये मोदी यांनी केलेल्या योगदानाबद्दल आणि भारत आणि डॉमिनिका यांच्यातील भागीदारी मजबूत करण्याच्या त्यांच्या समर्पणाला हा पुरस्कार देण्यात येणार आहे.

# भारत-चीनमधील गस्तीची पहिली फेरी पूर्ण

## गलवान संघर्षानंतर होता तणाव

वृत्तसंस्था...

**लडाख :** पूर्व लडाखमधील भारत-चीन सीमेवर भारतीय लष्कराकडून गस्त घालण्याची पहिली फेरी पूर्ण झाली आहे. डेमचोक आणि डेपसांग भागात १ नोव्हेंबरपासून पेट्रोलिंग सुरू झाली. संरक्षण सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन्ही भागात एकदा भारतीय सैनिक आणि एकदा चिनी सैनिक गस्त घालतील. गस्तीसाठी मर्यादित सैनिकांची संख्या निश्चित करण्यात आली आहे.

हा आकडा कोणता आहे याबाबत अद्याप माहिती समोर आलेली नाही. पूर्व लडाखमधील सीमावादावरून भारत आणि चीनमध्ये चार वर्षांपासून तणाव होता.

दोन वर्षांच्या वाटाघाटीनंतर, २१ ऑक्टोबर रोजी दोन्ही सैन्याने वादग्रस्त बिंदू डेपसांग आणि डेमचोकमधून माघार घेण्याचा करार झाला. करारावर परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी २७ ऑक्टोबर रोजी सैन्य मागे घेणे ही पहिली पायरी असल्याचे सांगितले होते.



**सोलापूर :** सोलापूर येथील विमानतळ पुन्हा एकदा सेवेसाठी सज्ज झाले आहे, पण विमानतळावर नाईट लॅण्डिंगची सोय नाही. त्यामुळे निवडणूक प्रचारासाठी आलेल्या व्हीव्हीआयपी, व्हीआयपी नेत्यांसह, काही कामानिमित्त आलेल्या उद्योजकांना दिवस मावळण्यापूर्वीच सोलापुरातून उड्डाण करावे लागत आहे.

# सौदीत मिळाले 4 हजार वर्षे जुने शहर

## ५० हून अधिक घरे, १४ किमी लांब भिंत

वृत्तसंस्था

**अल-नताह :** सौदी अरेबियात सुमारे ४ हजार वर्षे जुन्या एका शहराचा शोध पुरातत्व तज्ज्ञांनी लावला आहे. सौदीत एका वाळवंटात हरवलेल्या ४ हजार वर्षे जुन्या किल्लेवजा शहराच्या शोधामुळे त्या काळात जनजीवत शहरी राहणीमानात बदलत होते असे स्पष्ट होत असल्याचा संशोधकांचा दावा आहे. उत्तर-पश्चिम सौदीत मिळालेल्या या प्राचीन शहराचे नाव अल-नताह आहे. हे शहर दीर्घकाळापासून खैबरच्या भिंतींनी वेढलेल्या नखलिस्तानात हरवले होते. या क्षेत्रात प्राचीन काळातही प्रगत संस्कृती होती याचा पुरावा या शोधामुळे मिळाला आहे. या अध्ययनाचा तपशील प्लस वन नावाच्या एका नियतकालिकात प्रकाशित झाला आहे. खैबरच्या वाळवंटी भागातील हे स्थळ प्रारंभिक कांस्य युगाच्या भटक्यापासून स्थिर जीवनशैलीतील बदलाशी थेट जोडलेले आहे. फ्रेंच पुरातत्व तज्ज्ञ गिलाउम चार्लोक्स यांच्या नेतृत्वात करण्यात आलेल्या या संशोधनात प्राचीन ५० हून अधिक वेगवेगळी घरे आणि एक १४.५ किलोमीटर लांब भिंत शोधण्यात आली आहे.

# इसवणाच्या तुलनेत बांगड्यांचे उत्पादन जास्त

## एलईडी मच्छीमारीचा बसतोय फटका

**पणजी :** राज्यात इसवण आणि शिंगाला (कॅटफिश) सारख्या मोठ्या माशांपेक्षा बांगड्यांचे उत्पादन जास्त होते. एलईडी मासेमारीचा याला फटका बसला आहे. मोठे मासे एलईडी वापरणाऱ्या ट्रॉलरकडे वळतात, असे मच्छीमारांनी सांगितले. गेल्या तीन वर्षांत राज्यात मासे मिळण्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे पुन्हा बांगड्यांची संख्या वाढली आहे.

२०२१-२२ मध्ये राज्यातील एकूण मत्स्य उत्पादन १ लाख ११ हजार टन होते. त्यानंतर २०२२-२३ मध्ये १ लाख १६ हजार टन मत्स्य उत्पादन झाले. २०२३-२४ मध्ये मत्स्य उत्पादन १ लाख ४० हजार टनांवर पोहोचले.

## भारत-सौदीच्या विदेश मंत्र्यांदरम्यान द्विपक्षीय बैठक

**नवी दिल्ली :** विदेशमंत्री एस. जयशंकर यांनी बुधवारी दिल्लीत सौदी अरेबियाचे विदेशमंत्री प्रिन्स फैसल बिन फरहान अल सौद यांच्यासोबत द्विपक्षीय बैठक घेतली आहे. या बैठकीत दोन्ही देशांदरम्यान रणनीतिक भागीदारी मजबूत करणे आणि भविष्यात सहकार्यासाठी नवे मार्ग शोधण्यावर चर्चा झाली आहे. आमची भागीदारी प्रगतिपथावर असून याचा भर भविष्यावर आहे.

# कॅनडा व्हिसा नियमामुळे विद्यार्थी सदम्यात!

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्ली :** भारतीय विद्यार्थ्यांमध्ये परदेशात जाऊन शिक्षण घेण्याची क्रेझ शिगेला पोहोचली आहे. दरम्यान, कॅनडाने व्हिसा नियमात बदल करून विद्यार्थ्यांचे स्वप्न उद्ध्वस्त केले आहे. तेव्हापासून, विद्यार्थी आता कॅनडाचा पर्यायी देश शोधत आहेत, जिथे ते अभ्यास करू शकतील आणि त्यांचे जीवन चांगले बनवू शकतील. गेल्या आठवड्यातच, कॅनडाने आपली फास्ट-ट्रॅक स्टुडंट व्हिसा प्रणाली समाप्त केली, ज्या अंतर्गत २०२३ मध्ये बहुतेक भारतीय विद्यार्थी कॅनडामध्ये शिकण्यासाठी गेले होते. स्टुडंट डायरेक्ट स्ट्रीम (एसए) आणि नायजेरिया स्टुडंट एक्स्प्रेस योजना, ज्यात भारतासह १६ देशांचा समावेश आहे.

कॅनडात सर्वाधिक भारतीय विद्यार्थी जात असतात. परराष्ट्र मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार १ जानेवारी रोजी कॅनडामध्ये ४.२७ लाख भारतीय विद्यार्थी होते, जे इतर कोणत्याही देशापेक्षा जास्त आहे. यानंतर अमेरिकेत ३.३७ लाख, ब्रिटनमध्ये १.८५ लाख आणि ऑस्ट्रेलियात १.२२ लाख विद्यार्थी आहेत.

## भारतीय विद्यार्थ्यांमध्ये घट नोंदवली जात आहे

२०१६ आणि २०१९ दरम्यान, यूएस विद्यापीठांमध्ये प्रवेश घेतलेल्या भारतीय आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या संख्येत १३ टक्क्यांनी घट झाली आहे; परंतु कॅनडाच्या विद्यापीठांमध्ये १८२ टक्क्यांनी वाढ झाली आहे,' असे अमेरिकन थिंक टँक नॅशनल फाउंडेशन फॉर अमेरिकन पॉलिसीने प्रकाशित केलेल्या इमिग्रेशन डेटाच्या विश्लेषणात म्हटले आहे. एप्रिलमध्ये अधिक प्रतिबंधात्मक इमिग्रेशन आणि आंतरराष्ट्रीय विद्यार्थी धोरणे आणि युनायटेड स्टेट्समध्ये ग्रीन कार्ड मिळवण्यात अडचण हे महत्त्वाचे घटक होते.

## आता युरोप वा ऑस्ट्रेलियाचा पर्याय



# बेकायदा जुगार अड्ड्यावर छापा!

## ४८ लाखांचा मुद्देमाल जप्त

## तीन जुगारींना ठेवले कारवाईपासून लांब

## बीड पोलीस पथकाची धडाकेबाज कारवाई

## अवैध धंद्यावाल्यांचे धाबे दणाणले

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई शहराजवळील पांढरवाडी फाटा येथे बीडच्या विशेष पोलीस पथकाने बेकायदा जुगार अड्ड्यावर छापा टाकून जवळजवळ ४८ लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त केला असून, अकरा जणांवर गुन्हा दाखल केला आहे ही कारवाई पथक प्रमुख बाळराजे दराडे यांच्या उपस्थितीत करण्यात आली. गेवराई व तालुक्यात अवैध व्यवसायाला चाप बसला पाहिजे, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, गेवराई शहराजवळील पांढरवाडी फाटा येथील एका हॉटेलमध्ये बेकायदा जुगार चालू असल्याची माहिती पोलिसांना मिळताच पोलिसांनी संबंधित ठिकाणी जाऊन धाड टाकली असता त्या ठिकाणी अकरा जण तीन पाणी पत्त्यांचा खेळ खेळत असल्याचे आढळून आले. यावेळी त्यांच्याकडून जवळजवळ ४८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. जप्त केलेल्या वाहनांची किंमत ४३ लाख



३० हजार, जप्त केलेल्या मोबाईलची किंमत २ लाख ८५ हजार, व जप्त केलेली रोख रक्कम २ लाख ३ हजार ७०० रुपये असा एकूण ४८ लाख १८ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अकरा जणांवर गुन्हा दाखल झाला असून, या छाप्यामधून तीन जणांना पान २ वर...

### बीडच्या पथकाने तिघांना चिमण चाऱ्यावर सोडले!


बीडच्या पथकाने दिनांक १४ नोव्हेंबर रोजी रात्री उशिरा पांढरवाडी फाटा येथील एका हॉटेलमध्ये चालू असलेल्या जुगार अड्ड्यावर छापा मारून ११ जणांना ताब्यात घेतले परंतु सोन्या चांदीने मडलेल्या एकासह दोन जणांना कारवाईपासून दूर ठेवल्याची चर्चा होत आहे. या तिघांना सोडून देण्यात देवाण-घेवाण झाली की काय असा संशय सर्वसामान्यांना येऊ लागला आहे. याबाबत कारवाई प्रमुख यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला परंतु संपर्क होऊ शकला नाही. एक विशेष असे की तपास अधिकारी यांनी कारवाई प्रमुख यांचा मोबाईल क्रमांक देण्यास टाळाटाळ केल्याचे आढळून आले.

### तलवाडा अवैध धंद्यांचे माहेरघर

तलवाडा या ठिकाणी दारू, गुटखा ,मटका असे अनेक अवैध व्यवसाय सुरू असून, बऱ्याच वेळा पोलीसही याकडे कानाडोळा करत असल्याचे दिसून येत आहे. याबाबतीत तक्रारीही होत असतात परंतु किरकोळ कारवाई करून पोलीस अशांना सोडून देत असतात त्यामुळे अशा व्यवसाय करणाऱ्यांचे चांगलेच फावत असते. तलवाडा पोलीस ठाणे हद्दीत दारू, गुटखा व मटका मोठ्या प्रमाणात विकला व खेळला जात असून, याकडे पोलीस यंत्रणाचे साप दुर्लक्ष असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात गुटखाबंदी होऊनही अनेक छोट्या मोठ्या पान टपरी किराणामाल तसेच खाद्यपदार्थ विकणाऱ्या बेकरीतही मोठ्या प्रमाणात गुटखा विक्री सर्रास उपलब्ध असल्याचे पाहायला मिळत असूनसुद्धा अन्न व औषध प्रशासन तसेच पोलिस यंत्रणा याकडे सोयीस्करपणे डोळेझाक करीत असल्याचे दिसून येत आहे

# केजमध्ये भुरटे पुढारी 'खोके घेऊन ओके'?

चर्चा:आधी केला विरोध आता खोके घेऊन चुडीचूप



केज /पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील काही नेते आणि कार्यकर्ते महायुतीचा उमेदवार नमिता लोखंडे व अक्षय मुंदडा आणि नंदकिशोर मुंदडा यांच्या वर खूप नाराज होते मागील काही काळात आम्हाला नंदकिशोर मुंदडा यांनी खुप त्रास दिला या निवडणुकीमध्ये आम्ही नंदकिशोर लोखंडे यांनी दिलेल्या त्रासामुळे निवडणूकीत यांचे काम करणार नाहीत असे केज तालुक्यातील काही भुरटे पुढारी म्हणत होते परंतु आता पहायला गेलो तर केज तालुक्यातील तसेच चिंचोली माळी सर्कलचे भुरटे पुढारी आता महायुतीच्या उमेदवार नमीता लोखंडे यांची चप्पल सांभाळायची सुध्दा त्यांची तयारी आहे यांचे कारण काय असा प्रश्न पान २ वर...

# महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेचा पाठिंबा

एकजूट: अनिलदादा जगताप यांचे पारडे जड

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडूक तोंडावर येऊन ठेपलेली असताना बीड विधानसभा अपक्ष उमेदवार मा. अनिलदादा जगताप यांना विविध संघटनेचा जाहीर पाठिंबा मिळत असून बीड मतदार संघात अनिलदादा यांची ताकद दिवसेंदिवस वाढत चालली आहे. काल दि. १५ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष शेख अमर जैनुद्दीन यांच्या आदेशा नुसार बीड विधानसभा अपक्ष उमेदवार मा. अनिलदादा जगताप यांना विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला. तसेच सर्वांनी मिळून बीड विधानसभा मतदारसंघातील सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी यांना सूचित केले की, अनिलदादा जगताप यांनाच सहकार्य करावे आणि विक्रमी मताधिक्याने निवडून आणावे. याप्रसंगी



महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष शेख अमर जैनुद्दीन, प्रा.पंडीत तुपे, ॲड. नजर खान, शेख खय्युम इनामदार, शेख नसीरभाई बीड जिल्हाध्यक्ष, सुंदर वाघमारे, जयत शिवाजीराव वाघ बीड जिल्हा उपाध्यक्ष, हनुमंत बाबासाहेब मिसाळ बीड तालुकाध्यक्ष, शेख खय्युम बीड शहराध्यक्ष, शेख खदीरभाई, शेख असरार बीड शहर उपाध्यक्ष, सय्यद फेरोज बीड तालुका उपाध्यक्ष, रौफ शेखउपस्थित होते. या सर्वांनी मिळून अनिलदादा यांना पाठिंब्याचे पत्रक ठेऊन विजयासाठी शुभेच्छा दिल्या. दरम्यान अनिलदादा यांनी महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेच्या सर्व पदाधिकारी सदस्यांचे आभार व्यक्त केले.

# मतदान, मतमोजणीच्या ठिकाणी कलम लागू

धोरण:जिल्हा प्रशासन झाले अलर्ट

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोबर २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. सदर कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे. तसेच विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान प्रक्रिया होणार असून २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे. त्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाची निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मतदान केंद्र व मतमोजणीच्या ठिकाणी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू करण्यात आल्याचे आदेश अपर जिल्हा दंडाधिकारी शिवकुमार स्वामी





यांनी निर्गमित केले आहेत.

सदर आदेश निवडणुकीची कामे हाताळताना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये या दृष्टीकोनातून २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदानाच्या दिवशी व २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणीच्या दिवशी सकाळी ०६ वाजेपासून ते मतदान प्रक्रिया व मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अंमलात राहतील. तसेच प्रत्येक ईसमावर सदर आदेश तामील करणे शक्य नसल्यामुळे हे एकतर्फी आदेश ध्वनीक्षेपकावर पोलिसांनी जाहीर करून त्यास प्रसिद्धी द्यावी, असेही आदेशात नमूद आहे.भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मतदान केंद्राच्या ठिकाणापासून १०० मीटर व मतमोजणी केंद्राच्या ठिकाणापासून २०० मीटर परिसरातील सर्व पक्ष कार्यालय, उमेदवारांचे मंडपे, सर्व दुकाने इत्यादी तसेच मोबाईल, कॉडलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, सर्व प्रकारचे फेरीवाले व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे इत्यादींच्या वापरावर बंदी घालण्यात येत आहे. निवडणुकीच्या कामाव्यतिरिक्त इतर खाजगी वाहनांना प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. मतदान केंद्राच्या ठिकाणापासून १०० मीटर व मतमोजणी केंद्राच्या ठिकाणापासून २०० मीटर परिसरात नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना पान २ वर...

# बीडमध्ये बदल घडविण्यासाठी एकत्र

निर्णय: ओबीसी,अनिल जगतापांच्या विजयासाठी एकत्र



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आज नवगण राजुरी येथून गणरायाचे दर्शन घेऊन अनिल दादा जगताप यांना पाठिंबा जाहीर करत

विविध ओबीसी समाज संघटनानीं अनिल दादा जगताप यांना जाहीर पाठिंबा दिला.अनिल दादा जगताप यांची मनोज दादा जरांगे पाटील यांचे कट्टर समर्थक व मराठा आंदोलक तथा सर्व सामान्य जनतेचा हक्काचा माणूस अशी ओळख प्रचलित असलेले विधानसभा उमेदवार असून सध्या परिस्थितीत बीड विधानसभेसाठी अनेक उमेदवार आपले नशीब आजमावित असताना जाती-जातीत तेढ निर्माण करण्याचे काम क्षीरसागर कुटुंबाकडून जाणीवपूर्वक केले जात आहे या सर्वाला चाप म्हणून , सर्व समाजाला सोबत घेऊन चालणारे पान २ वर...

# भावनिक करुन मते मिळवायची आहेत?

सवाल: टाळूवरचे लोणी कोण खातंय

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज अंबाजोगाई मतदार संघ लुटुन खाणारे आमदारा पती अक्षय मुंदडा जनतेला वेड्यात काढताना दिसत आहे कारण २०१९ शरद पवारांना धोका देऊन भाजप पक्षाची उमेदवारी स्विकारली तसेच मग येणाऱ्या काळात भाजपला व आ.पंकजा मुंडे यांना



मुंदडा कुटुंबीय सोडणार नाही कशावरून असा प्रश्न उपस्थित होतो आहे कारण अक्षय मुंदडा ज्या वेळेस पवार साहेबांकडे होते तेव्हा म्हणाले की माझ्या आईने मला मरताना सांगितले आहे राजकारण सोड पन पवार साहेबांना सोडु नको व नंतर भाजप पक्षात आल्यावर आता म्हणतायत की माझ्या आईने जर शेवटची भेट घेतली असेल तर मुंडे साहेबांची घेतली असे बोलून अक्षय मुंदडा पान २ वर...

# चला लोकशाही बळकट करु

धोरण:घरपोच आलेल्या अधिकाऱ्याकडे मतदान



लोणार/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने लोणार शहरातील ८५ वर्ष व त्या त्यापेक्षा जास्त वयाचे मतदार तसेच दिव्यांग मतदार यांचे मतदान घेण्यासाठी आज दिनांक १४ /११/ २०२४ रोजी पथक प्रमुख क्षेत्रीय अधिकारी श्रीमती विभा शिवचंद्र वराडे मुख्याधिकारी नगरपरिषद लोणार, श्री आर डी शिंदे ,सहाय्यक अभियंता पंचायत समिती लोणार, सूक्ष्म निरीक्षक महेश कुमार गजानन ,चांदणे पोस्टमन पोस्ट ऑफिस मेहकर ,श्री एचडी शेवाळे तलाठी लोणार, एम आर घोडके तलाठी लोणार ,पोलीस संतोष चव्हाण एच सी बक्कल नंबर १३२४ पोलीस स्टेशन लोणार ,प्रकाश रमेश मोरे कोतवाल लोणार, व्हिडिओ ग्राफर प्रकाश साखरे यांच्यासह वाहन चालक, मालक तसेच पर्यवेक्षक सतीश कापुरे सह इडज सुचित शेटे, राहुल अशोक मोरे ,पारस सुटे ,सुधीर काळे ,शेख हबीब शेख गुलाब ,शेख अब्दुल बरकत ,मनोहर काळबांडे, नितीन मुरलीधर राऊत ,सर्जेराव फुफाटे ,अनंत कायंदे, सुनील दगडू पुरी ,ही पूर्ण टीम लोणार शहरातील वयोवृद्ध आणि दिव्यांग मतदारांचे मतदान घेण्यासाठी मतदारांचे घरपोच दाखल पान २ वर...



# रेणुका यात्रेत रंगणार कुस्त्यांचा फड !


परंपरा: भाविक-भक्तांचा लोटणार मेळा

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील जिवाची वाडी येथे शुक्रवारी माहूरची आई (रेणूका) माता देवी यात्रेचे आयोजन केले असून धार्मिक कार्यक्रमांसह कुस्त्यांचा फड रंगणार आहे. शुक्रवारी देवीच्या पालखीची मिरवणूक, आकाशात सप्तरंग उधळणाऱ्या शोभेच्या फटाक्यांची आतषबाजी, करमणुकीसाठी लोकनाट्य तमाशा मंडळाचे अयोजन केले आहे. शनिवारी जंगी कुस्त्यांचा सामना होणार असून योग्य बक्षीस दिले जाणार आहे. जिवाची वाडीसाठी एस. टी. बस सकाळी ९:०० आणि संध्याकाळी ६:०० मुक्कामी बससेवा चालू असून खासगी वाहनांची पान २ वर...

## बोंबला | दादांची वाटचाल पराभवाच्या दिशेने

# बंजरा समाज मेळाव्यात खुर्च्या रिकाम्या







माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

मोंढा मैदान येथे बंजारा समाजाचा मेळावा ठेवण्यात आला होता या मेळाव्यात महंत जितेंद्र जी महाराज यांची उपस्थिती ही होती जितेंद्रजी महाराज बोलताना म्हणाले आमच्या बंजारा समाजाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी समाजासाठी बऱ्याच योजना देण्याचे काम या ठिकाणी केलेले आहे.व तुम्ही पन दादा आमच्या बंजारा समाजाची अशी मागणी आहे की तुम्ही माजलगाव च्या धरणाला वसंतराव नाईक साहेब असे नाव पान २ वर...

### सुज्ञ बंजारा समाज अलिप्तच: रामशेठ राठोड

माजलगाव येथे बंजारा समाजाचा मेळावा घेण्यात आला या मेळाव्या त समाजाने पाठ फिरवली कोणत्याही पक्षाच्या मागे समाज जाणार नाही किंवा विकला जाणार नाही आमचा समाज सुज्ञ आहे कोणाच्याही दावणीला बांधला जाणार नाही समजणे विद्यमान आमदाराला त्यांची जागा दाखवून दिलेली आहे

## इसार पावती

लिहुन घेणार निलावती अनिलकुमार भोरे वय ४७ वर्षे, धंदा नौकरी रा.गणेश रो हाऊस २, व्यंकटेश विद्यालया मागे, भक्ती कन्स्ट्रक्शन, बीड ता.जि.बीड

लिहुन देणार शाहेद नवाब्योद्दीन खतीब वय ४२ वर्षे, बंदा व्यापार रा. केज ता. केज जि. बीड सुमार सन २०२४ इ.स. कारणे इसार पावती लिहुन देतो की, माझ्या मालकी व ताब्यातील नगरपंचायत केज ता. केज जि.बीड हद्दीतील सर्वे नं. ४०० मधील प्लॉट क्र.२९ साईज पूर्व पश्चिम १२.३० मिटर व दक्षिण उत्तर ९.५० मिटर एकुण ११६.८५ चौ मीटर ज्याची चतु: सीमा - प्लॉट नं.३०,पश्चिमेस -९ मीटरचा रस्ता, दक्षिणेस-प्लॉट क्र.२२, उत्तरेस-प्लॉट नं.२० सदर जागा तुम्हास रक्कम रुपये १९,५०,०००/- अक्षरी एकोणवीस लाख पन्नास हजार रुपये) मध्ये विक्री करण्याचा ठराव केला.

येणे प्रमाणे वरील चतु: शिवीच्या आतील जागा कायमची विक्री करण्याचा करार केला असून सदर ठराव पोटी तुमच्याकडून आज रोजी रक्कम रुपये २,००,०००/- अक्षरी दोन लाख रुपये) नगदी घेतली असून उर्वरित रक्कम १७ लाख ५० हजार (अक्षरी सतरा लाख पन्नास हजार रुपये) घेऊन सदरील जागा कायम स्वरूपी लिहून घेणार यांना विक्री करण्याचे ठरलेले आहे. तसेच सदरील जागेचे खरेदीखत दि.३०/११/२०२४ रोजी पर्यंत करण्याचे ठरलेले आहे.करिता आज रोजी सदर इसार पावती आधारे कायम करून देत असून त्यास मी कसल्याही प्रकारची उजर किंवा हरकत करणार नाही. करता करिता इसार पावती ही कोणाच्याही दबावाला बळी न पडता व कसल्याही प्रकारे नशा पाणी न करता लिहून दिली ती खरी व बरोबर आहे.